रायगड, नवी मुंबई
वर्ष १८ • अंक १४९
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## पहलगाम हल्ल्याचा साजिद जट्ट सूत्रधार; चार्जशीट दाखल



**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेने सोमवारी (दि. १५) जम्मू येथील विशेष न्यायालयात चार्जशीट दाखल केली. या चार्जशीटमध्ये दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर सैफुल्लाह साजिद जट्ट उर्फ साजिद जट्ट याला या भीषण हल्ल्याचा मुख्य सूत्रधार असल्याचे सांगण्यात आले आहे. एनआयएने साजिद जट्टवर १० लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केले आहे. त्याचे मूळ गाव कसूर (जि. पंजाब, पाकिस्तान) असून तो लष्कर-ए-तोयबामधील हाफिज सईदनंतर तिसऱ्या क्रमांकाचा नेता आहे. २२ एप्रिल रोजी सशस्त्र दहशतवाद्यांनी पहलगाममधील बैजसन घाटी येथे अंदाधुंद गोळीबार करत २६ निष्पाप नागरिकांची हत्या केली होती. हल्लेखोरांनी आधी पर्यटकांचा धर्म विचारला आणि त्यांनी हिंदू असल्याचे सांगताच गोळ्या घातल्या होत्या. या प्रकरणी तपास सुरू आहे.

### अंतरंग

उरण-नेरूळ, बेलापूर मार्गावर लोकल फेऱ्यांमध्ये वाढ/२
समुद्रकिनारी पर्यटकाचे लग्न; प्रशासन अनभिज्ञ/५
'कुस्ती स्पर्धेतून मातीशी नाळ जुळवून ठेवण्याचे काम'/८

(अधिक छायाचित्रे पान ८वर..)

# महापालिकांचा महासंग्राम

## ■ १५ जानेवारीला मतदान, १६ रोजी निकाल



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणातील सर्वात चर्चेचा विषय ठरलेल्या महानगरपालिका निवडणुकांची घोषणा सोमवारी (दि. १५) करण्यात आली. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका एकाच टप्प्यात घेतल्या जाणार आहेत. यासाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान, तर दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ तारखेला मतमोजणी होणार असल्याचे राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका प्रलंबित होत्या. २७ पालिकांची मुदत संपली होती तसेच जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन पालिका अस्तित्वात आल्या आहेत. मुंबई (बृहन्मुंबई) महापालिका ही एक सदस्यीय, तर इतर २८ महापालिकांमध्ये बहूसदस्यीय निवडणूक असणार आहे. सर्व ठिकाणी तत्काळ आचारसंहिता लागू झाली आहे.

राज्यातील २८६९ जागांसाठी निवडणूक होणार आहे. यातील १४४२ जागा या महिलांसाठी राखीव असणार आहेत. निवडणूक इव्हीएम मशीनवरच घेण्यात येणार असून नामनिर्देशनपत्र ऑफलाईन स्वीकारण्यात येईल. उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यांत सादर करावे लागणार आहे.

### असा आहे कार्यक्रम

**अर्ज भरणे : २३ ते ३० डिसेंबर**
**अर्ज छाननी : ३१ डिसेंबर**
**माघारीची मुदत : २ जानेवारी**
**चिन्ह वाटप : ३ जानेवारी**
**मतदान : १५ जानेवारी**
**मतमोजणी : १६ जानेवारी**

### २९ ठिकाणी निवडणूक

मुंबई (बृहन्मुंबई), पुणे, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, ठाणे, भाईंदर, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, नवी मुंबई, पनवेल, पिंपरी-चिंचवड, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नांदेड-वाघाळा, सांगली-मिरज-कुपवाड, मालेगाव, अकोला, अहिल्यानगर, धुळे, जळगाव, परभणी, चंद्रपूर, लातूर, इचलकरंजी, जालना.

*महापालिका निवडणुकीसाठी संभाव्य दुबार मतदारांची ओळख शोधून काढली आहे. त्यांच्या नावासमोर डबल स्टार करण्यात आले आहे. महापालिका आयुक्तांमार्फत संभाव्य दुबार मतदारांच्या घरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले असून दुबार मतदारांना विचारून तो कुठल्या मतदान केंद्रावर मत देईल हे लिहून घेण्यात आले आहे. त्या मतदान केंद्राव्यतिरिक्त त्याला इतर कुठेही मतदान करू दिले जाणार नाही.*
***-दिनेश वाघमारे,** राज्य निवडणूक आयुक्त*

## जनता आम्हाला पुन्हा शहर विकासाची संधी देईल : मुख्यमंत्री



**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत जनता आम्हाला पुन्हा शहर विकासाची संधी देईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांच्या तारखा घोषित केल्याबद्दल मला खूप आनंद आहे. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो, कारण राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे कारभार प्रशासकाच्या मार्फत चालवणे हे लोकशाहीला अभिप्रेत नव्हते. न्यायालयाच्या निर्णयामुळे दीर्घकाळ या संस्था निर्माण लोकप्रतिनिधींविना होत्या. आता पुन्हा या निवडणुका होत आहेत. आम्हाला विश्वास आहे की, आमच्या शासनाने केलेले काम पाहता पुन्हा लोक आमच्याच बाजूने कौल देतील. जनता आम्हाला पुन्हा शहर विकासाची संधी देईल.

आम्ही जास्तीत जास्त ठिकाणी महायुती करत आहोत. अनेक ठिकाणी भाजप-शिवसेना युती होईल. काही ठिकाणी भाजप-राष्ट्रवादी युतीही होताना दिसेल, मात्र जिथे युती नसेल तेथे आम्ही मैत्रीपूर्ण पद्धतीने लढत देऊ. यात कुठेही कटूता नसेल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

या वेळी विरोधकांना सुनावताना मुख्यमंत्री म्हणाले की, मतदार याद्यांमध्ये घोळ आहे हे आम्हीदेखील दाखवले आहे, पण त्याकरिता निवडणुका घ्यायच्या नाहीत असे करता येणार नाही. गेले २०-२५ वर्षे जे लोक निवडणुका लढवत आहेत, त्यांना माहिती आहे कमी अधिक प्रमाणात मतदार यादीमध्ये घोळ असतोच, पण सर्वोच्च न्यायालयाचे आदेश मिळाल्यानंतरही काही ना काही कारण काढून निवडणुका पुढे करा अशी ओरड करणे योग्य नाही. या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेले प्रतिनिधी असले पाहिजेत. त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था असली पाहिजे. म्हणून आमची मागणी आहे की, निवडणुका वेळेवरच व्हाव्यात.





### महापालिका क्षेत्रात ३२५ कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन

# पनवेलचा विकास अविरत सुरू राहील

### भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची ग्वाही



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे नागरीकरण झपाट्याने होत असून हे क्षेत्र एज्युकेशन हब म्हणून पुढे येत आहे. पनवेल महापालिका क्षेत्राचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही महापालिका दत्तक घेतली आहे. त्यामुळे यापुढेही नागरिकांचे प्रश्न मार्गी लावतानाच विकासाची गंगा अविरतपणे सुरू राहील, अशी ग्वाही भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि.१५) येथे दिली.

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये सुमारे ३२५ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पनवेल येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात मार्गदर्शनात्मक कार्यक्रम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्या वेळी प्रदेशाध्यक्ष चव्हाण बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, आयुक्त मंगेश चितळे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारूशीला घरत, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, आरपीआयचे पनवेल महापालिका जिल्हा क्षेत्राचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्यासह सर्व मंडळ अध्यक्ष, माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

या वेळी पिसार्वे तलाव पुनर्जीवित व सुशोभीकरण, कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पूल, खारघर सेक्टर १९मधील भूखंड क्र.१४ येथे प्रभाग कार्यालय व सेक्टर ३६मधील भूखंड क्र. १३ येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, कळंबोली सेक्टर ८मधील सन शाईन सोसायटीपर्यंत काँक्रीट रस्ता व सेक्टर ८ ई मधील भूखंड क्र. ६, ७ व ८ येथील प्रभाग कार्यालय, कामोठे सेक्टर ११मधील भूखंड क्र. १ बी येथील प्रभाग कार्यालय, तक्का येथे डोमिनोजसमोरील मोकळ्या जागेत येथे कोळी समाजाचे शिल्प आणि लोकनेते दि.बा. पाटील शाळा येथे 'दिबां'बद्दल माहिती दर्शविणारे म्युरल व सुशोभित कक्ष यांचे लोकार्पण करण्यात आले. याचबरोबर नवीन पनवेल सेक्टर १८मधील भूखंड क्र. ८-अ, ८-ब या भूखंडावर उभारण्यात येणारे माता व बालसंगोपन केंद्र, पनवेल बसस्थानकामागे प्रधानमंत्री आवास योजना व मुख्यमंत्री आवास योजनेंतर्गत कुष्ठरोग पीडितांसाठी व खुल्या विक्रीसाठी प्रस्तावित गृह प्रकल्प, महापालिका हद्दीतील लायन्स गार्डन ते पीडब्ल्यूडी ऑफिस ते जुने कोर्ट ते बंदर नाका काँक्रीटीकरण रस्ता आणि प्रभाग समिती ड येथील भूखंडावर व्यावसायिक दुकाने बहुमजली वाहनतळाच्या कामाचे भूमिपूजन झाले.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना पुढे सांगितले की, पूर्वी नगर परिषद असलेल्या पनवेलचे महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर या भागाचा विकास व्हावा ही लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची नेहमीच तळमळ राहिली आहे. पनवेल महापालिकेच्या निर्मितीपासून ते तिच्या वाढीपर्यंत मी साक्षीदार आहे. या महापालिकेच्या स्थापनेपासूनच पनवेलच्या विकासकामांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा सातत्यपूर्ण आग्रह राहिला आहे. द्रष्टे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून महापालिकेला बळ देण्याचे काम सुरू असून नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. आज या कामांचे लोकार्पण व भूमिपूजन होत असताना पनवेलमध्ये आश्वासक कार्य झाल्याचे स्पष्ट दिसत आहे.

पनवेल महापालिकेची भव्य प्रशासकीय इमारत कोकण व मुंबईचे प्रवेशद्वार ठरत आहे. १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय पूर्णत्वास गेले आहे. माता-भगिनींसाठी सुसज्ज रुग्णालय उभारण्यात येत आहे. वैद्यकीय सुविधांच्या विस्तारासाठी आमदार प्रशांत ठाकूर हे नेहमीच आग्रही राहिले आहेत. महापालिकेच्या शाळा सुसज्ज व दर्जेदार असून लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयाचा प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी विशेष उल्लेख केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोकडून ३४१ भूखंड महापालिकेकडे वर्ग करण्यात आले असून याचा मोठा फायदा महापालिकेला झाला आहे. नव्याने स्थापन झालेली महापालिका असली तरी पनवेलमध्ये विकासाचे पर्व कायम राहणार असून स्पष्ट विचारधारा व दूरदृष्टी ठेवून काम सुरू आहे. अल्पावधीतच पनवेल महापालिकेने नागरिकांना केंद्रबिंदू मानून प्रभावी कामगिरी केली आहे. गतिमान, प्रगतीवान आणि आधुनिकीकरणाच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर व व्यासपीठावरील सर्वांच्या पाठपुराव्यामुळे लवकरच पनवेल महापालिका 'ड' वर्गातून 'क' वर्गात जाईल, असा विश्वासही प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी व्यक्त केला.

खारघर टोलचा प्रश्न होता तेव्हा देवेंद्रजी प्रदेशाध्यक्ष होते. त्यांनी आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी टोलमाफी करण्याचे आश्वासन मला दिले व तो शब्द खरा केला. सिडकोकडे अनेक भूखंड होते, ते मी अध्यक्ष असताना महापालिकेला वर्ग करून परत मिळवता आले. (पान २ वर..)

### पनवेलला मुबलक आणि नियमित पाणी मिळणार -आमदार प्रशांत ठाकूर



आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे स्वागत व आभार व्यक्त केले. त्यांनी पुढे म्हटले की, आपले शहर मोठे आणि सक्षम व्हावे ही प्रत्येकाची भावना असते. त्या अनुषंगाने महानगरपालिका कायम प्रयत्नशील राहिली आहे. त्यामुळे झपाट्याने विकासाची गंगा आली. ग्रामीण भागाला विशेषतः २९ गावांचा समावेश महापालिकेत झाला तेथे प्रथम सुविधा दिल्या पाहिजेत यासाठी काम झाले. आमदार म्हणून न्हावाशेवा टप्पा ३ योजनेचा पाठपुरावा सुरू केला. त्यानुसार फेब्रुवारी २०२६मध्ये हे काम पूर्ण होणार असून त्यामुळे मुबलक आणि नियमित पाणी मिळणार आहे. त्याचबरोबर शिलार धरणातून पनवेलला पाणी उपलब्धता होणार आहे, याबद्दल गणेश देशमुख व मंगेश चितळे यांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

### निवडक

#### 'उबाठा'ला धक्का! तेजस्वी घोसाळकर भाजपमध्ये दाखल

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला धक्का बसला आहे. माजी नगरसेवक दिवंगत अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी, माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर यांनी सोमवारी (दि. १५) भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम आणि विधान परिषद सदस्य प्रवीण दरेकर यांच्या उपस्थितीत 'कमळ' हाती घेतले.

#### राम मंदिर आंदोलनातील नेते रामविलास दास वेदांती यांचे निधन

**अयोध्या :** राम मंदिर आंदोलनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे आणि दोनवेळा खासदार राहिलेले डॉ. रामविलास दास वेदांती यांचे सोमवारी (दि. १५) निधन झाले. मध्य प्रदेशातील रीवा येथे एका कथा महोत्सवावेळी अचानक त्यांची तब्येत बिघडली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांची प्राणज्योत मालवली. ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्यावर मंगळवारी अंत्यसंस्कार होतील.

## कोकण आपत्ती सौम्यीकरण पॅकेज अंतर्गत कामांना रायगडात सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

निसर्ग आणि तौक्ते वादळांच्या तडाख्यानंतर कोकणातील नैसर्गिक आपत्तींचा धोका कमी करण्यासाठी राज्य शासनाने तीन हजार कोटींच्या कोकण आपत्ती सौम्यीकरण पॅकेजची घोषणा केली होती. या अंतर्गत निवारा केंद्र, खारबंदिस्ती, धूप प्रतिबंधक बंधारे व भूमिगत वीज वाहिन्यांच्या कामांना मोठ्या प्रमाणात मंजुरी देण्यात आली असून यातील कामांना आता सुरुवात झाली आहे. रायगड जिल्ह्यात एक हजार कोटींची कामे सुरू झाली आहेत.

कोकण किनारपट्टीला निसर्ग आणि तौक्ते या दोन चक्रीवादळांचा तडाखा बसला होता. या वादळांमुळे जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या वित्तहानीला सामोरे जावे लागले होते. आपत्ती व्यवस्थापनातील त्रुटी या वादळांमुळे समोर आल्या होत्या. कोकण किनारपट्टीवर सतत येणारी चक्रीवादळे आणि त्यामुळे जनजीवनावर होणारा परिणाम लक्षात घेऊन प्रशासनाने व्यापक पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला. यानंतर कोकण आपत्ती सौम्यीकरण पॅकेजची घोषणा करण्यात आली. यात प्रामुख्याने चक्रीवादळांमुळे होणारे धोके कमी करण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा समावेश होता. या अंतर्गत रायगड जिल्ह्यात विविध कामे सुरू करण्यात आली आहेत. (पान २ वर..)

**या पॅकेज अंतर्गत होणाऱ्या कामांमुळे कोकणातील आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम होणार असून नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण होण्यास मोठी मदत होणार आहे.**
**-सागर पाठक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, रायगड**

## 'छत्रपती संभाजी महाराजांना दगाफटका झाला नसता तर इतिहास वेगळा असता'

**इचलकरंजी : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज लढवय्ये होते. त्यांना पराभूत करण्याची ताकद औरंगजेब आणि मोगलांमध्ये नव्हती. ते दगाफटक्यामध्ये शहीद झाले नसते, तर देशाचा इतिहास वेगळाच असता, अशा शब्दांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १५) देदीप्यमान इतिहासाचे स्मरण केले.

इचलकरंजी येथील के.एल. मलाबादे चौकात धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाच्या लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज नसते तर भगवा रंग कोठेही दिसला नसता. म्हणून महाराजांचे आपल्यावर असणारे उपकार आपण कधीही फेडू शकत नाही.



औरंगजेबाला वाटले छत्रपती शिवाजी महाराजांनंतर संपूर्ण महाराष्ट्रावर कब्जा करता येईल. हिंदवी स्वराज्यच संपून जाईल, पण छत्रपती संभाजी महाराज ही एक तळपती तलवार होती. नऊ वर्षे त्यांनी औरंगजेबाला झुंजवले. औरंगजेब महाराष्ट्रात आला, पण मराठ्यांनी त्याची कबरच महाराष्ट्रातच खोदली. औरंगजेबाला कधीच मराठी मुलुख जिंकू दिला नाही. नऊ वर्षांमध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी १२० लढाया लढल्या. यातील एकही लढाई कधी हरले नाहीत.


छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास या देशातील असा देदीप्यमान इतिहास आहे की, तो प्रत्येकापर्यंत पोहचायलाच पाहिजे. दुर्दैवाने आमच्या देशात छत्रपती शिवरायांचा आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास हा स्वातंत्र्यानंतरही दडपण्याचा प्रयत्न झाला. अगदी काल-परवापर्यंत 'सीबीएसई' अभ्यासक्रमात जो इतिहास शिकवला जायचा, त्यामध्ये मोगलांच्या इतिहासाची १७ पाने होती, तर छत्रपती शिवाजी महाराजांवर केवळ एक परिच्छेद होता. आम्ही १७ पाने बाबर, अकबर, औरंगजेब हे सगळे शिकायचो, पण आता मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देतो. त्यांनी निर्णय बदलला. आता एका परिच्छेदात मोगलांचा इतिहास आहे, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला २१ पाने दिली गेली. संपूर्ण मराठी आणि हिंदवी स्वराज्याचा इतिहास आपल्या मुलांना आता शिकायला मिळत आहे. खरा इतिहास जनजनात पोहचत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### स्मारकाचे लोकार्पण

# चवदार तळे क्रांती दिनाचा शताब्दी महोत्सव शासनाने साजरा करावा -आमदार दरेकर

**महाड : प्रतिनिधी**

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये नामदार प्रवीण दरेकर यांनी महाडच्या चवदार तळ्याच्या क्रांती दिनाला येत्या २०२६मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत असून, यानिमित्त शताब्दी महोत्सव न भूतो न भविष्य असा दैदिप्यमान सोहळा साजरा करावा अशी मागणी सभागृहात केली. त्याचबरोबर महाबळेश्वर पोलादपूर मार्गे दापोली व पुणे मढे घाट मार्गे महाड या महामार्गाचा निर्मितीची देखील मागणी दरेकरांनी यावेळी केली.



महाड करांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा व संपूर्ण भारताच्या समता व क्रांतीचे प्रेरणास्थान असलेल्या चवदारतळे क्रांती दिनाला २०२६ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. चवदारतळे परिसराचे चवदारतळे विकास प्राधिकरण च्या माध्यमातून सुशोभीकरण करून हा शताब्दी महोत्सव मोठ्या उत्साहात व जागतिक दर्जाचा साजरा करावा अशी मागणी प्रवीण दरेकर यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशना दरम्यान सभागृहांमध्ये मांडली.

या मागणी बरोबरच त्यांनी ऐतिहासिक महाडचा पर्यटन विकास व्हावा यासाठी पुणे मढेघाट मार्गे महाड या पर्यटन महामार्गाची निर्मिती करावी तसेच महाबळेश्वर पोलादपूर मार्गे दापोली या महामार्गाची देखील निर्मिती करून पर्यटनाला चालना द्यावी अशी मागणी त्यांनी केली. त्यांच्या या मागणीने महाड करांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

# नेरळपाडा रेल्वे गेटला टेम्पोची धडक

## तासभर वाहतूक झाली ठप्प



**नेरळ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरील नेरळ पाडा रेल्वे गेटला मालवाहू पिकअप टेम्पोची धडक बसल्याने रविवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास येथे वाहन वाहतूक तब्बल एक तासाहून अधिक काळ बंद ठेवण्यात आली. रविवार असल्याने आणि विकेंडमुळे कर्जत-कल्याण राज्य मार्गावर माथेरानकडे जाणाऱ्या पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरू होती. परिणामी पर्यटकांची वाहने, स्थानिक नागरिकांची वाहने आणि मालवाहतूक वाहने यामुळे संपूर्ण मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली.

नेरळ शहराच्या दिशेकडून नेरळ पूर्व परिसरात निघालेला मालवाहू पिकअप टेम्पो नेरळ-कळंब या राज्य मार्गावरील पाडा रेल्वे गेटजवळ आला असता, एक्स्प्रेस रेल्वेगाडी येत असल्याने फाटक बंद करण्यात येत होते. मात्र घाईगडबडीत टेम्पोचालकाने रेल्वे गेट ओलांडण्याचा प्रयत्न केल्याने टेम्पोच्या वरच्या बॉडीची जोरदार धडक रेल्वे गेटला बसली. या धडकेत रेल्वे गेट मोडून पडल्याने तात्काळ पर्यायी गेट बंद करून संपूर्ण वाहन वाहतूक थांबवण्यात आली.

या घटनेचा रेल्वे वाहतुकीवर कोणताही परिणाम झाला नसला, तरी रस्ते वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. पर्यायी मार्ग म्हणून नेरळ-दामत रेल्वे गेटमार्गे वाहतूक वळवण्यात आल्याने कर्जत-कल्याण राज्य मार्गावरील दामत परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. नेरळ पाडा हा परिसरातील एकमेव सुस्थितीत असलेला राज्य मार्ग असल्याने येथून दररोज हजारो वाहने धावतात. मात्र पर्यायी मार्गांची अवस्था अत्यंत दयनीय असल्याने वाहनचालकांना दीड किलोमीटरचा फेरा मारावा लागला, तर खराब रस्त्यांमुळे प्रवाशांना मानसिक तणाव सहन करावा लागला.दरम्यान, या प्रकरणी संबंधित टेम्पोचालकास रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेऊन वाहन जप्त करण्यात आले आहे. मात्र नेरळ पाडा रेल्वे गेट परिसरात महिनाभरात दोन ते चार वेळा अशा घटना घडत असल्याने ही समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. नाहक सर्वसामान्य नागरिक, कामगार, विद्यार्थी आणि पर्यटकांना वारंवार या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

# दुबार मतदार शोधण्यासाठी नवी मुंबई महापालिकेची विशेष मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने मतदार यादीतील दुबार मतदार शोधण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत असून त्याकरिता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेसोबत पालिकेचे कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत.

त्यानुसार दुबार मतदार शोधण्यासाठी संगणक प्रणाली तयार केली असून दुबार मतदारांच्या नावानुसार, विधानसभा यादी भाग याप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.

दुबार मतदारांचे फोटो असलेली मतदार यादी सदर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेकडे देण्यात आलेली आहे. त्यांचेमार्फत दुबार मतदार पडताळणी करून मार्क कॉपी मध्ये नोंद करण्यात येणार आहे व त्यास अनुसरून सदर मतदार एकाच ठिकाणी मतदान करेल याची खात्री करण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिका मतदार यादीत नाव शोधणे सोपे जावे याकरिता https://mahasecvoterlist.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली असून त्यामुळे मतदारांना आपले नाव व क्रमांक शोधणे सुलभ व सोपे झाले आहे.नवी मुंबई महानगरपालिकेच्या https://www.nmmc.gov.in/ या संकेतस्थळावरही नाव आणि मतदार क्रमांक शोधण्याची सुविधा उपलब्ध आहे.

याशिवाय सर्व विभाग कार्यालयांमध्ये 'मतदार मदत कक्ष' सुरु करण्यात आले आहेत. तरी नवी मुंबईकर मतदार नागरिकांनी याची नोंद घ्यावी आणि मतदार यादीतील आपले नाव व क्रमांक याची माहिती ऑनलाईन सुविधेचा उपयोग करून हातातील मोबाईलच्या एका क्लिकवर सहजपणे उपलब्ध करून घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

# दिवाळे गावात मच्छीविक्रेत्या महिलांना १७ गाळ्यांचे वाटप

## आमदार मंदा म्हात्रे यांच्यामार्फत उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

दवाळे गाव हे नवी मुंबईतील नव्हे तर महाराष्ट्रातील पहिले स्मार्ट व्हिलेज असून याची नोंद देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही घेतली आहे. त्या अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकारातून दिवाळे गाव येथे आधुनिक सुसज्ज असे मासळी मार्केट उभारण्यात आले होते त्यानुसार मासळी मार्केटमधील उर्वरित १७ गाळ्यांचे अधिकृत वाटप माजी नगरसेवक व भाजपा नवी मुंबई जिल्ह्याचे महामंत्री निलेश म्हात्रे तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त सोमनाथ पोटरे व सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी प्रशांत नेरकर यांच्या हस्ते दिवाळे गावातील मच्छी विक्रेत्या महिला यांना वाटप करण्यात आले.

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नाने दिवाळे गाव - स्मार्ट व्हिलेज अंतर्गत संपूर्ण दिवाळे गाव हा स्मार्ट व्हिलेजच्या पूर्णत्वास जात आहे. तसेच समाजपयोगी बहुउद्देशीय इमारत, तरुणांसाठी व्यायाम शाळा, विद्यार्थी-वाचकांसाठी सुसज्ज ग्रंथालय व कंप्युटर प्रशिक्षण केंद्र, विविध कार्यक्रमासाठी मंच अशी अनेक कामे प्रगतीपथावर सुरु आहे असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

यावेळी आ. मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, या मासळी मार्केटमुळे स्थानिक मच्छीमारांना हक्काचे व्यवसायिक स्थान उपलब्ध झाले असून स्वच्छता, पाणी, वीज व संरक्षित विक्री व्यवस्था यांचा लाभ झाला आहे.

# उरण-नेरुळ, बेलापूर मार्गावर लोकल फेऱ्यांमध्ये वाढ; प्रवाशांना दिलासा

**उरण : वार्ताहर**

बेलापूर नेरूळ या महत्त्वाच्या उपनगरी रेल्वे मार्गावर धावणाऱ्या लोकल गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली असून, आजपासून या मार्गावर एकूण ५० लोकल फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी प्रत्यक्ष सुरू झाल्याने दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या मार्गावर लोकल फेऱ्यांमध्ये वाढ व्हावी यासाठी उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी सातत्याने आणि प्रभावी पाठपुरावा केला होता. प्रवाशांची वाढती गर्दी, दैनंदिन प्रवासातील अडचणी तसेच वेळेअभावी होणारे हाल लक्षात घेऊन त्यांनी रेल्वे प्रशासनासह केंद्र व राज्य सरकारकडे वेळोवेळी मागणी केली होती. अखेर त्यांच्या प्रयतकांना यश आले असून, प्रवासी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी उरणबेलापूरनेरूळ मार्गावर दररोज २० फेऱ्या जाणाऱ्या आणि २० फेऱ्या येणाऱ्या, अशा एकूण ४० फेऱ्या कार्यरत होत्या. मात्र प्रवासी संख्या झपाट्याने वाढल्याने या फेऱ्या अपुऱ्या ठरत होत्या. आता दहा अतिरिक्त फेऱ्यांची वाढ करून एकूण ५० फेऱ्या सुरू करण्यात आल्याने गर्दीमध्ये लक्षणीय घट होणार असून प्रवास अधिक सुरक्षित, वेळेत व सुलभ होणार आहे.




गव्हाण रेल्वे स्टेशन तसेच दिवंगत प्रकल्पग्रस्तांचे नेते दी. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अगदी जवळ असलेल्या तरघर रेल्वे स्टेशन आजपासून सुरू करण्यात आले आहेत.त्यामुळे विमानतळ परिसर, औद्योगिक क्षेत्रे तसेच नवी मुंबईकडे येजा करणाऱ्या प्रवाशांसाठी रेल्वे प्रवास अधिक सोयीस्कर झाला आहे. विशेषत:कार्यालयीन वेळा, शाळामहाविद्यालयीन विद्यार्थी, कामगार वर्ग तसेच उरण, पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील नोकरदार प्रवाशांसाठी ही वाढ अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. गर्दी कमी झाल्याने प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळत असल्याने या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल प्रवासी वर्गाने केंद्र सरकार, राज्य सरकार आणि रेल्वे प्रशासनाचे मनापासुन आभार मानले

# मुरूडच्या विज्ञान प्रदर्शनात सोलर मोटरसायकलने वेधले सर्वांचे लक्ष

**मुरुड : प्रतिनिधी**

मुलांची वैज्ञानिक दृष्टीकोन वाढावा व मुलांना विज्ञान विषयी आस्था निर्माण होऊन बाल संशोधक तयार होण्यासाठी दरवर्षी डिसेंबर महिन्यात प्रत्येक तालुक्यांमधून विज्ञान प्रदर्शन शिक्षण विभागाकडून आयोजित करण्यात येत असते. नुकतेच मुरुड तालुक्याचे विज्ञान प्रदर्शन सपन्न झाले परंतु या प्रदर्शनात सर्वांचे लक्ष वेधून घेतले ते सोलर सायकलने इंधनाची बचत व स्वस्त प्रवास होण्यासाठी सोलर वर चालणाऱ्या मोटार बाईक भविष्यात उपयोगी ठरणार असून सोलर वापरासाठी सध्या शासनाकडून विविध योजना सुद्धा कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

मुरुड तालुक्यातील ५३ वे विज्ञान प्रदर्शन काशीद येथे सपन्न झाले. यावेळी येथे सौर ऊर्जे वर चालणारी मोटर सायकल ने सर्वांचे लक्ष वेधले आहे. चोरढे मुख्याध्यापिका संगीता भगत यांच्या मार्गदर्शनाखाली येथील प्राथमिक विद्यार्थी व शिक्षक वृद्धांच्या सहकार्यातून सौर ऊर्जेवर चालणारी मोटर सायकल बनवण्यात आली आहे. या शाळेतील आरोही अशोक पाटील, काव्य नरेश तांबडे, वैष्णवी केसरीनाथ आंबलिकर, वृषभ रामचंद्र चोरढेकर या शालेय विद्यार्थ्यांनी या मोटर सायकलचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले.

सध्या डिझेल, पेट्रोल, कमतरता व त्याद्वारे होणारे प्रदूषण पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेऊन येथील शालेय विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक असे सोलर बाईकचे चल मॉडेल बनवले आहे. या मॉडेल साठी कमी खर्च येतो पर्यावरणाचा नाश होत नाही प्रदूषणाला आळा बसतो अशी माहिती यावेळी



येथील विद्यार्थ्यांनी दिली आहे. या प्रयोगाचे मुख्य शिक्षक विजय जाधव यांनी या प्रात्यक्षिक बद्दल सांगताना सांगितले की, या सोलर मोटर सायकल मध्ये १७ वॅट चे सौर ऊर्जा उपकरण बसवण्यात आले आहे. मोटर सायकल सोलर मध्ये संचित केलेल्या सूर्यकिरणापासून विद्युत ऊर्जेत रूपांतर करते. तद्नंतर सदरची ऊर्जा गतीत ऊर्जेत रूपांतर झाल्याने सदरची सोलर मोटर सायकल रस्त्यावर अधिक वेगवान गतीने धावत असते. सदरची मोटार सायकल ही ऊर्जा अक्षयतेच्या नियमावर बनवण्यात आल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

या प्रदर्शनात मुलानी सदरची सायकल स्वतः चालवून दाखवून सर्व उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले आहे. एक अनोखा व जगाला सोलर प्रणाली कशी उपयुक्त ठरू शकते हे दाखवणारे विज्ञान प्रात्यक्षिके भावी पिढीस निश्चितच उपयोगाचे ठरणार आहेत.

# पोलादपूर नगरपंचायत हद्दीत डिसेंबरच्या १५ दिवसांत १४ श्वानदंश रूग्णांची नोंद

## वर्षभरात आजमितीस २७४ जणांना श्वानदंश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील आबालवृध्द, स्त्री-पुरूष नागरिकांना सुरक्षिततेचे जीवन तसेच वावरणे देणे हा त्यांचा अधिकार अबाधित ठेवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालातील मुद्दे दूर्लक्षित करून मुख्याधिकारी शिपाई यांनी नगरपंचायत हद्दीतील सर्व सरकारी व खासगी आस्थापनांना आदेशित केल्यानंतर पंचायत समितीतील विस्तार अधिकारी हंबीर यांनाही १ डिसेंबर रोजी श्वानदंश झाल्याने पोलादपूर पं.स.गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी मुख्याधिकारी शिपाई यांना मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने पत्र दिले. यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यास २ डिसेंबर रोजी पंचायत समितीच्या आवारात श्वानदंश झाला. त्यामुळे मुख्याधिकारी शिपाई यांनी अन्य आस्थापनांकडे भिरकावलेला सर्वोच्च न्यायालयाच्या नागरिकांना सुरक्षिततेचे जीवन तसेच वावरणे देणेसंदर्भातील निकालावरील आदेशपत्राचा चेंडू पोलादपूर पंचायत समितीने व्यवस्थित टोलवला असला तरी नागरिकांच्या सुरक्षिततेकडे सपशेल दूर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे.

भटकी कुत्री, गुरे आणि माकडांच्या तसेच अन्य प्राण्यांच्या उपद्रवाविरोधात संबंधित प्रशासनाने ठोस कारवाई करून नागरिकांचे जीवन सुरक्षित करण्याचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायमूताअच्या बेंचने दिले आहेत. पोलादपूरचे कायदेतज्ज्ञ





जेष्ठ नागरिक पंडीत उर्फ सुधीर चित्रे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाचा हवाला देत मोकाट कुत्री-गुरांच्या बंदोबस्तासाठी टपालाद्वारे निवेदन पाठविले. पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी शिपाई यांनी तहसिलदारांसह सर्व आस्थापनांना श्वानमुक्त परिसरासाठी २८ नोव्हेंबरच्या पत्राने आदेशित करून नागरिकांच्या सुरक्षेचा चेंडू अन्य आस्थापनांकडे भिरकावला आहे. या प्रशासकीय उडवाउडवीमध्ये पोलादपूर शहरातील १४ व्यक्तींना १५ डिसेंबरपर्यंत श्वानदंश झाल्याची नोंद ग्रामीण रूग्णालयामधून प्राप्त झाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे तीन न्यायाधिशांच्या बेंचने महापालिका व इतर सर्व संस्थांना दि.०७-११-२०२५रोजीच्या निकाल पत्राने आदेश दिले आहेत. या निकालामध्ये सर्व संबंधित संस्थांना काय कारवाई केली याबाबत तीन महिन्यांच्या कालावधीची मुदत देऊन संबंधित संस्थाप्रमुख तसेच लोकप्रतिनिधी यांच्यावरही कारवाईचे संकेत दिले आहेत.

या निकालाचे गांभिर्य लक्षात न घेता पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी स्थानिक प्राणी जन्म नियंत्रण समितीची स्थापना तसेच आस्थापना परिसर श्वानमुक्त ठेवण्यासाठी नोड अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश देत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील मुद्दे नमूद करून पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी शिपाई यांनी पोलादपूर तहसिलदार, पंचायत समिती गटविकास अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता, सहायक पोलीस निरिक्षक, ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, पशू वैद्यकीय अधिकारी, सर्व शाळा महाविद्यालयांचे प्राचार्य व मुख्याध्यापक आणि एस.टी.महामंडळाचे आगार व्यवस्थापक यांना आदेशित केले आहे. पोलादपूरच्या रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांसंदर्भात कोणतीही कारवाई करण्याची जबाबदारी पार पाडलेली नाही

# प्रोफेसर डॉ.अनिल सिंह यांना साहित्य गौरव पुरस्कार प्रदान

**माणगाव : प्रतिनिधी**

हिंदी साहित्य,शिक्षण व संशोधन क्षेत्रात भरीव आणि प्रेरणादायी कार्य करणारे अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ तसेच सोनूभाऊ बसवंत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. अनिल सिंह यांना 'साहित्य गौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. शिक्षण प्रसारक मंडळ,माणगाव आणि अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान,माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हा गौरव प्रदान करण्यात आला. 'आधुनिक हिंदी साहित्य में मूल्यविमर्श : परंपरा,परिवर्तन और चुनौतियाँ' या राष्ट्रीय संमेलनाचे ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याच संमेलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या योगदानाची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला.

पान १ वरुन

## पनवेलचा विकास अविरत सुरू राहील

मैदाने, बगीचे, आरोग्य केंद्र अशीही अनेक कामे मार्गी लागली. विशेष म्हणजे सर्वात जास्त आरोग्य केंद्र असलेली पनवेल महानगरपालिका ठरली आहे. या महापालिकेला विकासाचे रूप मिळाले आणि ते रूप प्रत्यक्षपणे साकार होत आहे. पुढील काळातही विकासाचा हा प्रवाह सुरूच राहील. आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेलचे नाव जागतिक नकाशावर झळकले आहे. जनतेने वेळोवेळी दिलेल्या आशीर्वादांमुळेच हे शक्य झाले असून पुढेही हेच पाठबळ मिळेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

पनवेल महापालिकेने उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आयुक्त मंगेश चितळे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. आमदार विक्रांत पाटील यांचेही या वेळी भाषण झाले. प्रास्ताविकात आयुक्त मंगेश चितळे यांनी यांनी विकासकामांच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली.

## कोकण आपत्ती सौम्यीकरण पॅकेज अंतर्गत कामांना रायगडात सुरुवात

कोकण आपत्ती सौम्यीकरण योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात एक हजार कोटींची कामे प्रस्तावित करण्यात आली होती, ज्यात निवारा शेड बांधकाम, धूपप्रतिबंधक आणि खारबंदिस्ती बंधारे यांचे नूतनीकरण तसेच शहरी भागात भूमिगत वीज वाहिन्या टाकण्याच्या कामाचा समावेश होता. पॅकेज अंतर्गत जिल्ह्यात ६२ ठिकाणी निवारा केंद्रांची उभारणी केली जाणार आहे. यात २८ खासगी, तर २४ शासकीय जागांवरील निवारा केंद्रांचा समावेश आहे. खासगी जागांवर उभारण्यात येणाऱ्या एकूण २८पैकी २२ निवारा केंद्रांचे काम सुरू झाले असून उर्वरित सहा केंद्रांसाठी जागेची अडचण निर्माण झाली आहे. ती सोडवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. या निवारा केंद्रांसाठी सुमारे ४३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे, तर ३४ शासकीय जागांवर बहुउद्देशीय निवारा केंद्र उभारली जाणार असून त्यापैकी २१ ठिकाणी कामे सुरू झाली आहेत. उर्वरित कामे लवकरच सुरू होणे अपेक्षित आहेत या प्रकल्पासाठी ८२.५७ कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे.

कोकण किनारपट्टीवरील खारपाण्याचा शेतजमिनीवर होणारा परिणाम रोखण्यासाठी खारबंदिस्तीची १४ कामे मंजूर करण्यात आली असून त्यापैकी १२ कामे सध्या प्रगतिपथावर आहेत. या कामांसाठी सुमारे ७६ कोटी रुपये खर्च होणार आहेत. दरम्यान, अलिबाग तालुक्यातील सासवणे येथे धूप प्रतिबंधक बंधारे उभारण्यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद आहे तसेच आपत्तीकाळात वीजपुरवठा अधिक सुरक्षित राहावा यासाठी भूमिगत वीज वाहिन्यांचे तब्बल ५५० कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पुढील दोन वर्षात ही सर्व कामे होणे अपेक्षित आहेत.

## निवडक

### अपघातामध्ये विद्यार्थिनीचा मृत्यू

**पनवेल :** पेट्रोल भरण्यास स्कूटी ढकलत घेऊन जात असताना अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून एक तरुणी जखमी झाली आहे. साक्षी अरुण पाटील (वय १५, रा. पाटनोली) असे मृत तरुणीचे नाव आहे; तर कृतिका दिनकर भगत (वय १५) ही जखमी झाली. या अपघातप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. साक्षी पाटील ही पेट्रोल भरण्यासाठी एक्टिवा स्कुटी ढकलत घेऊन जात होती. दरम्यान, जेएनपीएवरून पळस्पेकडे येणाऱ्या सेवा रस्त्यावर पंकज पार्किंगच्या जवळ पुलाच्या खाली त्या आल्या. पुढे कुंडेवहाळ येथे अज्ञात वाहनाने साक्षी पाटील आणि तिच्यासोबत असलेली मैत्रीण कृतिका भगत यांना धडक दिली. या धडकेत साक्षीचा मृत्यू झाला.

### बॅगेतील चार लाख रुपये लंपास

**पनवेल :** ज्येष्ठ नागरिकाच्या बॅगेतील चार लाख रुपये खेचून दोघे जण दुचाकीवरून पसार झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात ११ डिसेंबरला गुन्हा दाखल करण्यात आला. सुबोधचंद्र मायाराम कलीता हे खारघर, सेक्टर २० येथे राहत असून, त्यांनी बँकेतून चार लाख रुपये फंडाची रक्कम काढली होती. ती रक्कम प्लास्टिकच्या बॅगमधून घेऊन ते घराकडे पायी जात होते. सेंट्रल पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यावर पाठीमागून आलेल्या दोघांनी त्यांच्या हातातील पैशांची पिशवी खेचून पळून गेले.

### आठ तोळ्यांच्या हाराची चोरी

**पनवेल :** महिलेच्या गळ्यातील आठ तोळे वजनाचा सोन्याचा हार आणि सोनसाखळी खेचून दोघेजण दुचाकीवरून पळून गेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुंदा गावंड (वय ४५) या करंजाडे, सेक्टर आर ५ येथे राहत असून, त्या लक्ष्मीनारायण मंदिरात लग्नाला जात होत्या. रात्री पावणे दहाच्या सुमारास वाघिवली वाडी येथून चालत जात होत्या. त्याचवेळी दुचाकीवरून दोघे आले आणि त्यांनी त्यांच्या गळ्यातील आठ तोळ्यांचा हार आणि सोनसाखळी जबरदस्तीने खेचली. या झटापटीत कुंदा जमिनीवर पडल्या.

# पंतप्रधान मोदी प्रत्येक घटकाचा विचार करतात

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे पनवेलमध्ये प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशातील प्रत्येकाचे जीवन सुखमय झाले पाहिजे, या दृष्टिकोनातून पंतप्रधान नरेंद्र मोदी काम करत आहेत. एक माता जशी तिच्या कुटुंबाचा विचार करते, त्याचप्रमाणे कुटुंबप्रमुख म्हणून देशाचे पंतप्रधान प्रत्येक घटकाचा विचार करतात, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी पनवेलमध्ये यंत्रसामुग्री वाटपावेळी केले.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि प्रयत्नांतून प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत घरघंटी व शिलाई मशीन वाटपाच्या योजनेचा शुभारंभ झाला आहे. या उपक्रमांतर्गत



सोमवारी (दि.१५) भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत घरघंटी व शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या आवारात हा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, 'दिबां'चे चिरंजीव अतुल पाटील, कळंबोली शहराध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, राजेंद्र शर्मा, बबन मुकादम, मुकीत काझी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रमिला पाटील, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, मोनिका महानवर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, संजय भगत, मयुरेश नेतकर, बबन बारगजे, सतीश पाटील, राजेश गायकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित होते.



**कामोठे : येथे डॉ. गणेश शिंगाडे, डॉ. पंकज भिरुड, डॉ. अश्विनी शिंगाडे, डॉ.अमिता भिरुड यांनी श्री हॉस्पिटल सुरू केले आहे. या हॉस्पिटलचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी भाजप कामोठे शहराध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, भाजपच्या जिल्हा चिटणीस विद्या तामखडे, भाऊ भगत, प्रदीप भगत, आर.जी. म्हात्रे, रमेश तुपे, रवी गोवारी, सुशील शर्मा, सखाराम गारळे आदी उपस्थित होते.**



**उलवे : चांगल्या दर्जाच्या आरोग्याची सुविधा देण्यासाठी उलवे सेक्टर १७, प्लॉट नंबर ४१ येथे विश २ केअर हे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू झाले आहे. या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख तसेच डॉ. सुधाकर पाठक, डॉ. कपिल पाटील, डॉ. नेहा पाठक, डॉ. शुभम पाठक, डॉ. महावीर जैन, डॉ. श्वेता पाठक आदी उपस्थित होते.**

# नागरिकांच्या सुविधांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचे मोठे योगदान

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदार संघातील नागरिकांना सुविधा पुरवण्यात आमदार प्रशांत ठाकूर यांचे मोठे योगदान आहे. असे प्रतिपादन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी रविवारी नेरे महालक्ष्मी नगर येथे रस्त्याच्या लोकार्पण सोहळ्यावेळी केले.

नेरे येथील महालक्ष्मीनगरमधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीमधून २० लाख रुपये खर्च करून हे काम करण्यात आले होते. या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामासाठी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांनी हे महत्त्वाचे काम पूर्णत्वास गेले आहे.

या लोकार्पण सोहळ्याला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरपंच प्रकाश घाडगे, उपसरपंच राम पाटील, देवदास पिसाळ, दिनेश मानकामे, राजाराम खंडागळे, दिनेश जाधव, माजी उपसरपंच वंदना रोडपालकर, निलीमा पाटील, कल्पना वाघे, महालक्ष्मीनगर असोसिएशनचे चेअरमन जितेंद्र कुमार, अध्यक्ष नितीन कानिटकर, संतोष फुटाणे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संपूर्ण ताकदीने निवडणूक लढा -अविनाश कोळी

## प्रभाग ३मध्ये भाजप जनसंपर्क कार्यालयांचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गाफील न राहता संपुर्ण ताकदीने निवडणुकीला उतरा, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक ३ मध्ये झालेल्या विकास कामांच्या जोरावर आपण विजय नक्कीच खेचून आणू, असा विश्वास भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी तळोजा प्रभाग क्रमांक ३ मधील येथे जनसंपर्क कार्यालयांच्या उद्घाटनावेळी व्यक्त केला.

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ३मधील तळोजा फेज २ आणि ओवे शहर येथे भारतीय जनता पक्षाचे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयांचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आणि जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत



रविवारी झाले. या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खनावकर, पुर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, विनोद घरत, निर्दोश केणी, आशअ बोरसे, इम्तीयाज खान, सरफराज पठाण, संतोष पाटील, साजीद पटेल आदी उपस्थित होते.

या वेळी जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी मार्गदर्शना करताना सांगीतले की, भाजपचे पदाधिकारी हे नागरीकांशी संपर्क साधून त्यांच्या समस्या सोडवण्याचे काम करत आहेत. त्यामुळे येणाऱ्या महापालिका निडवणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला मोठे यश मिळेल. येणाऱ्या माहापलिका निडवणुकीमध्ये प्रभाग क्रमांक ३ मधील चारही नगरसेवक भारतीय जनता पक्षाचे असतील. त्यासाठी गाफील न राहता संपुर्ण ताकदीने निवडणुकीमध्ये उतरा, असे आवाहन केले.

### 'विकासकामांची माहिती मतदारांना द्या'

भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी, भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रत्येक घरापर्यंत पोहचून केंद्र आणि सरकाच्या योजनांची तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांची माहिती मतदारांना द्या, यासोबतच अंतर्गत मतभेद बाजूला ठेऊन संपुर्ण ताकद लावून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी आणि प्रभाग ३ मधील भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व टिकवण्यासाठी जोमाने कामाला लागा, असे कार्यकर्त्यांना सांगितले.

# खारघरमध्ये आधार व मोफत आयुष्यमान भारत कार्ड शिबिर



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथे १३ व १४ डिसेंबर रोजी सेक्टर १९ येथील विरंगुळा केंद्रामध्ये प्रभागातील नागरिकांच्या सोयीसाठी आधार कार्ड व मोफत आयुष्यमान भारत कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात मोठ्या संख्येने प्रभागातील नागरिकांनी संधीचा लाभ घेत जवळपास दीडशे नागरिकांनी आपल्या आधार कार्डमध्ये पत्त्या, नावामध्ये तसेच फोन नंबर लिंक करणे या सर्व सोयी सुविधांचा लाभ घेतला. खारघर पोस्ट ऑफिसच्या वतीने शून्य ते पाच वयोगटातील लहान मुलांचेदेखील नवीन आधार कार्ड बनविण्यात आले.

शिबिरामध्ये प्रभागातील वय वर्ष ७० पेक्षा जास्त असलेल्या नागरिकांसाठी मोफत आयुष्यमान भारत कार्ड काढून त्याचे त्वरित वाटपदेखील करण्यात आहे. युवाप्रेरणा सामाजिक संस्था ही नेहमीच खारघर मधील विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्याचे प्रश्न घेऊन कार्यरत असते. सामाजिक बांधिलकी जपणे ही काळाची गरज आहे असे या वेळेस युवाप्रेरणा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण पाटील यांनी सांगितले. भाजप नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचा यावर्षीचा वाढदिवस साजरा करत असताना प्रेम व्यक्त करा कृतीतून या उक्तीप्रमाणे आम्ही सर्वच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे समाजासाठी समाज उपयोगी उपक्रम राबवत कार्यरत असतो असे सांगितले.

या शिबिरात भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे सचिव इम्तियाज बागलकोटे तसेच भारतीय जनता पक्षाचे दिव्यांग प्रकोष्ठचे संयोजक नवनाथ गाढवे यांचे आयुष्मान कार्ड व आभा कार्ड काढण्यासाठी मोलाचे योगदान लाभले. शिबिर यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे सचिव आदित्य हातगे, युवाप्रेरणा सामाजिक संस्थेचे दिनेश यादव, गौरव पाटील, कुणाल देवकर, पायल पाटील, अनिकेत महाले, नितीन पाटील, रणजीत पाटील, जय पाटील, अंकित सौदा, युवराज जांगिड, योगेश मोरकर, ओमकार पाटील तसेच ज्येष्ठ नागरिक त्रिभुवन काका यांचे देखील सहकार्य लाभले.



**उरण : जेएनपीएचे चेअरमन गौरव दयाळ यांची भारतीय मजदूर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेतली. या वेळी संघाचे अध्यक्ष सुरेश पाटील, कामगार नेते सुधीर घरत, डी.पी. सोनावणे, सदानंद कोळी उपस्थित होते.**



**पनवेल : आई गावदेवी क्रिकेट संघ व ग्रामस्थ मंडळ केवाळे ठाकूरवाडी यांच्या वतीने ग्रामस्थ मंडळ चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहित केले. या वेळी भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी सरपंच प्रितेश डांगरकर, गोटीराम गायकर, राजाराम माळी, शंकर डांगरकर, योगेश जोमा माळी, कमळाकर निरगुडा, गणपत पारधी आदी उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे आरोग्य तपासणी शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे सोमवारी (दि.१५) राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अपोलो हॉस्पिटल बेलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नेरेपाडा पनवेल येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरात नेरेपाडा गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये अपोलो हॉस्पिटलच्या वैद्यकीय तज्ज्ञांच्या टीमने सर्व सहभागींल नागरिकांचे रक्तदाब, हृदयगती, बी एम आय, साखर तपासणी आदी मूलभूत आरोग्य तपासण्या



करून मार्गदर्शन केले. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवकांनी शिबिराचे नियोजन, नोंदणी व मार्गदर्शनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. या नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैली स्वीकारण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी अपोलो हॉस्पिटल व राष्ट्रीय योजना विभाग यांच्या पुढाकाराचे कौतुक करत भविष्यातही असे सामाजिक उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त केली. या शिबिराचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर, समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. श्वेतांबरी बोठे, प्रा. स्नेह नाईक तसेच समितीतील इतर सर्व सदस्य, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय स्वयंसेवक यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## संपादकीय

# संवेदनशीलताही हवी

गुरुला परमेश्वराच्या स्थानी मानण्याची आपली संस्कृती आहे. त्याच भावनेने शालेय विद्यार्थ्यांवर शिक्षकांचा आदर करण्याचा व त्यांच्या सर्व सूचनांचे पालन करण्याचा संस्कार केला जातो. पण अलीकडे एखाद्या शिक्षकाने केलेल्या शिक्षेमुळे विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याच्या किंवा शिक्षिकेच्या अतिकठोर वर्तणुकीमुळे विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याची समस्या मोठी आहेच. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भात सुस्पष्ट नियमावली जारी केली हे सुयोग्यच पाऊल म्हणावे लागेल.

**वसई येथील शाळेत अलीकडेच सहावीतील एका विद्यार्थिनीला बॅगसह उठाबशा काढण्याची शिक्षा करण्यात आली होती. उठाबशा काढताना या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. या प्रकरणानंतर संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाच्या हिंदी व इंग्रजी अशा दोन्ही शाळांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. अर्थात या शाळेतील शिक्षकांची शैक्षणिक अर्हता व व्यावसायिक पात्रताही निकषांप्रमाणे नसल्याचे आढळले होते. अलीकडेच देशात व राज्यात शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या काही घटनाही घडल्या आहेत. शिक्षकांनी केलेला अपमान वा शिक्षकांनी अन्य विद्यार्थ्यांकडून होत असलेल्या छळाकडे केलेले दुर्लक्ष अशी पार्श्वभूमी या प्रकरणांना होती. या घटनांमुळे एकंदरच शालेय विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य किती नाजुक अवस्थेत असू शकते याकडे लक्ष वेधले गेले. वास्तविक बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार शाळांमध्ये कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा किंवा मानसिक छळ अथवा अपमान केला जाण्यावर पूर्ण बंदी आहे. परंतु तरीही काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सोसवणार नाहीत अशा टोकाच्या शारीरिक शिक्षा दिल्या जात असल्याचे अधुनमधुन समोर येते. मानसिक छळ तर विद्यार्थ्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याखेरीज उजेडातही येत नाही. परंतु काही वेळा शिक्षकांकडून विद्यार्थ्यांसोबत जात, धर्म, भाषा, लिंग, अपंगत्व आदी कारणांवरून भेदभाव केला जातो हे सर्वज्ञात आहे. शिक्षक हे देखील समाजाचाच भाग आहेत, त्यामुळे समाजातील प्रवृत्ती शिक्षकांमध्येही दिसून येणे स्वाभाविक आहे. अनेकदा शिक्षकांचा हेतू शिस्त राखली जावी एवढाच असतो. त्यासाठी अभावितपणे एखाद्या विद्यार्थ्याला कठोर शिक्षा दिली जाते. शिक्षेच्या मर्यादेविषयीची प्रत्येक शिक्षकाची समज व दृष्टिकोन वैयक्तिक स्वरूपाचा व निराळा असू शकतो. त्यामुळे महाराष्ट्रातील शालेय शिक्षण विभागाने शनिवारी यासंदर्भातील शासननिर्णय जारी करून विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य अबाधित राखण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर निश्चित केली आहे. शासन निर्णयानुसार, विद्यार्थ्यांना मारहाण करणे, कान किंवा केस ओढणे, उठाबशा काढायला लावणे, उन्हात किंवा पावसात उभे ठेवणे, अपमानास्पद शब्द वापरणे, भेदभाव करणे, अन्न किंवा पाणी नाकारणे यांसारख्या कृती पूर्णत: निषिद्ध ठरवण्यात आल्या आहेत. शासन निर्णयात निषिद्ध म्हणून नमूद केलेल्या शिक्षांवरून नजर फिरवली तरी असे लक्षात येते की आजही ग्रामीण भागात किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल स्तरातील शाळांमध्ये हे असे प्रकार सर्रास घडतात. टोकाचे काही घडले तरच अशी प्रकरणे चव्हाट्यावर येतात. त्यामुळे शिक्षेच्या बाबतीत राज्यसरकारने शाळेतील संबंधितांना सुस्पष्ट नियमावली आखून दिली हे चांगलेच झाले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत, सीसीटीव्ही फुटेज व अन्य पुराव्यांसंदर्भातही स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. परंतु कागदोपत्री नियमावली आहे, परंतु प्रत्यक्षात परिस्थितीत फरक नाही असे घडता कामा नये. त्याकरिता शिक्षकांना विद्यार्थ्यांविषयी संवेदनशील करण्याचीही गरज आहे.**

# दि.बा. पाटील नामकरण : संघर्षाचा विजय, पण श्रेयवादाच्या लढाईत भूमिपुत्रांची केली जातेय दिशाभूल




नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे केवळ महाराष्ट्राच्या विकासाचे नवीन दालन नाही, तर आता ते रायगड, ठाणे, मुंबई आणि पालघर पट्ट्यातील भूमिपुत्रांच्या अस्मितेचे आणि संघर्षाचे प्रतीक बनले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांसाठी आयुष्य वेचणारे लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव या विमानतळाला द्यावे या मागणीसाठी झालेला लढा ऐतिहासिक ठरला. केंद्र आणि राज्य सरकारच्या मंजुरीनंतर या संघर्षाचा तांत्रिक विजय झाला असला तरी प्रत्यक्षात विमानतळाच्या प्रवेशद्वारावर नावाची पाटी कधी लागणार यावरून आता एक नवीन आणि तितकेच गुंतागुंतीचे राजकीय कुरुक्षेत्र तयार झाले आहे. दुर्दैवाने या नव्या राजकीय साठमारीत दि.बा. पाटील यांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या भूमिपुत्रांची एकजूट कुठेतरी विस्कळीत होताना दिसत आहे.

या संघर्षाची पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय सद्यस्थितीचे आकलन होणे कठीण आहे. नवी मुंबई वसविण्यासाठी जेव्हा शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने संपादित केल्या जात होत्या, तेव्हा दि.बा. पाटील यांनी शेतकऱ्यांना संघटित करून 'साडेबारा टक्के' परताव्याचे ऐतिहासिक धोरण पदरात पाडून घेतले. त्यामुळेच ज्या मातीवर हे विमानतळ उभे राहत आहे, त्या मातीशी आणि तिथल्या माणसांशी 'दिबां'चे नाते रक्ताचे आहे. म्हणूनच जेव्हा महाविकास आघाडी सरकारने या विमानतळाला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा प्रस्ताव पुढे केला, तेव्हा स्थानिक जनमानसात अस्वस्थता पसरली. बाळासाहेबांबद्दल आदर असूनही स्थानिकांचा आग्रह 'दिबां'च्या नावावरच होता. यातूनच पुढे 'सर्वपक्षीय नामकरण कृती समिती'चा जन्म झाला. या समितीने मानवी साखळ्यांपासून ते सिडको घेरावापर्यंत कार्यकर्त्यांवर एका मागून एक केसेस होत असतानादेखील जी ऐतिहासिक आंदोलने केली, त्यासमोर अखेर सत्तेला (महाविकास आघाडी) झुकावे लागले आणि शिंदे-फडणवीस सरकारने 'दिबां'च्या नावावर शिक्कामोर्तब केले.

**'दिबां'वरील आदर व सरकारी स्पष्टता**

संघर्षाच्या या पार्श्वभूमीवर लोकनेते दि.बा. पाटील यांच्या संघर्षाचे मोल आणि त्यांच्यावरील आदरभाव आजच्या प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्र पिढीमध्ये आत्मविश्वासाने दिसून येतो. हा केवळ नामकरणाचा प्रश्न नसून न्याय आणि अस्मितेची ती भावना आहे, जी 'दिबां'च्या विचारांवर आधारित आहे. या भावनांची दखल घेत शिंदे-फडणवीस सरकारने 'दिबां'च्या नावार शिक्कामोर्तब केले. विशेष म्हणजे नामकरणाच्या या निर्णयाबद्दल सत्ताधाऱ्यांमध्ये कोणतीही संदिग्धता नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथील अधिवेशनादरम्यान प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीला भेटून 'विमानतळाच्या नामकरणामध्ये कोणतीही संदिग्धता राहिलेली नाही,' हे स्पष्ट केले. संपूर्ण सरकार एकसुरात दि.बा. पाटील यांचेच नाव लागणार असे सांगत असताना केवळ काही विरोधी गटांच्या राजकीय अजेंड्यावर भूमिपुत्रांनी संतप्त प्रतिक्रिया देणे किंवा भावनिक होणे हे मूळ संघर्षाच्या ध्येयाला विसरण्यासारखे ठरू शकते.

**श्रेयवादाचा राजकीय पेच**

खरा राजकीय पेच आता निर्माण झाला आहे. नाव निश्चित झाले असले तरी नावाची अधिकृत पाटी यावरून श्रेयवादाची लढाई पेटली आहे. यामध्ये दोन स्पष्ट गट पडलेले दिसतात आणि विरोधाभास असा की, यातील भूमिकांमध्ये जमिनी-आसमानाचे अंतर आहे.

ज्या सर्वपक्षीय कृती समितीने ऊन-पाऊस झेलत हा लढा लढला ती समिती आता नाव मंजूर झाले असल्याने संयमाची भूमिका घेत आहे. भाजप आमदार आणि मंत्र्यांशी समन्वय साधून या नामकरणाची पाटी पंतप्रधान किंवा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शासकीय इतमामात व्हावी, अशी त्यांची इच्छा दिसते. घाईगडबडीत पाटी लावण्यापेक्षा त्याला कायदेशीर आणि शासकीय प्रतिष्ठा मिळावी, असे समितीला वाटते.

दुसऱ्या बाजूला स्थानिक पातळीवर असा एक गट अचानक आक्रमक झाला आहे, जो पूर्वी या लढ्यात सक्रिय नव्हता किंवा ज्यांचा कल बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाकडे होता. हे नेते आता २५ डिसेंबर अर्थात या विमानतळावर विमानसेवा सुरू होण्याचा मुहूर्त साधून त्याच दिवशी पाटी लागली पाहिजे असा हट्ट धरून बसले आहेत. यासाठी गावोगावी बैठकांचे सत्र सुरू असून वातावरण तापवले जात आहे. आश्चर्य म्हणजे सरकार पक्षाला विमानतळाला दुसऱ्या व्यक्तीचे नाव द्यायचे असून त्यासाठीच हा विलंब केला जात असल्याची आवई कृती समिती विरोधकांकडून पसरवली जात आहे. वरकरणी हा 'दिबां'वरील प्रेमाचा भाग वाटत असला तरी त्यामागील राजकीय गणिते दुर्लक्षित करता येणार नाहीत. २५ डिसेंबरच्या तारखेचा आग्रह हा समितीची कोंडी करण्यासाठी टाकलेला राजकीय डाव आहे. जर या तारखेला पाटी लागली नाही, तर समितीच्या नेत्यांना सत्ताधाऱ्यांचे मिंधे ठरवणे आणि जर लागली, तर आमच्या रेट्यामुळेच हे घडले असे सांगून श्रेय लाटणे अशी ही दुहेरी रणनीती यामागे आहे.

**भूमिपुत्रांच्या एकजुटीवर घातक परिणाम**

या राजकीय साठमारीचा सर्वात घातक परिणाम भूमिपुत्रांच्या समाजजीवनावर होत आहे. नामकरणाच्या या लढ्याने पाचही जिल्ह्यातील आगरी-कोळी-कराडी-भंडारी आणि इतर स्थानिक बलुतेदार समाजाला एका छताखाली आणले होते, जी एकजूट अनेक वर्षांनी पहायला मिळाली होती, मात्र आता 'तारीख' आणि 'पाटी' यावरून एकाच गावात दोन गट पडत आहेत. तुम्ही समितीचे की विरोधी गटाचे? असा प्रश्न कार्यकर्त्यांना आता विभागू लागला आहे. ज्या नेत्यांनी पूर्वी 'दिबां'च्या नावाला विरोध केला किंवा तटस्थ राहिले तेच आज आक्रमक होऊन समाजाची दिशाभूल करत आहेत हे चित्र संभ्रम निर्माण करणारे आहे. यामुळे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, नोकऱ्या आणि गावांचे विकासकाम या मूळ प्रश्नांवरून लक्ष विचलित होऊन चर्चा फक्त श्रेयवादावर येऊन थांबली आहे.

भविष्यातील निवडणुकांच्या दृष्टीने हे राजकारण अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. कृती समितीसमोर आपली विश्वासार्हता टिकवण्याचे आव्हान आहे, तर विरोधी स्थानिक नेत्यांना ही 'आयती संधी' वाटत आहे. भाजप आणि सोबतच्या गटाला स्थानिक भावना आणि कायदा सुव्यवस्था यांचा समतोल राखावा लागणार आहे.

शेवटी, दि.बा. पाटील यांचे संपूर्ण आयुष्य अन्यायाविरुद्ध लढण्यात आणि लोकांना जोडण्यात गेले. आज त्यांच्याच नावावरून समाजात फूट पडत असेल आणि श्रेयवादाचे राजकारण होत असेल, तर तो त्यांच्या विचारांचा पराभव ठरेल. विमानतळावर नावाची पाटी लागेलच, पण ती लावताना समाजाची मनं दुभंगणार नाहीत याची काळजी घेणे हेच 'दिबां'ना खरे अभिवादन ठरेल. २५ डिसेंबरचा मुहूर्त महत्त्वाचा की भूमिपुत्रांची वज्रमूठ टिकवणे महत्त्वाचे याचा विचार आता स्थानिकांनीच करण्याची वेळ नक्कीच आली आहे.

**-राजेश गायकर, पनवेल**

## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोनमध्ये नको असलेले ॲप्स असे करा अर्काइव्ह

बहुतेक स्मार्टफोन आता १२८ जीबी स्टोरेजसह येतात, पण स्मार्टफोनमधील हे स्टोरेज महत्त्वाचे फोटो, व्हिडीओ, फाईल्सने लगेच भरून जातात. आपण सहसा या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. जेव्हा स्टोरेज भरलेले असते, तेव्हा तुम्हाला ई-मेल पाठवण्यात, गुगल फोटोजमध्ये एखादा फोटो निवडण्यास अडथळा निर्माण होतो. मग तेव्हा आपण नको असलेले फोटो, व्हिडीओ, फाईल्स डिलीट करण्यास सुरुवात करतो.



फोनमधील स्टोरेजची समस्या सोडवण्यासाठी आम्ही एक खास युक्ती घेऊन आलो आहोत. ॲण्ड्रॉइड स्मार्टफोनमध्ये अनेक नको असलेले ॲप्सदेखील जास्त स्टोरेज फुल होण्यास कारणीभूत असतात. अनेक इन्स्टॉल केलेले ॲप्स फोनमधील महत्वाची जागा व्यापून घेतात. यातील असे अनेक ॲप्स असतात जे आपण इन्स्टाल करतो, पण त्याचा वापर करतच नाही.

ॲण्ड्रॉइड युजर्ससाठी, Googleने एक फीचर सादर केले आहे, जे न वापरलेले ॲप्स आपल्या फोनवरून अर्काइव्ह करतात आणि स्मार्टफोनमधील जागा मोकळी करतात. न वापरलेले ॲप्सचे चिन्ह, युजर डेटा आणि बेसिक फंक्शनलिटी इन्टॅक्टसह युजर्स रिमूव्ह करू शकतात. जेव्हा डिव्हाइसचे स्टोरेज कमी असेल तेव्हा तुम्ही ते पुन्हा ऑटो-अर्काइव्ह करू शकता.

या फीचरचा वापर कसा करायचा चला पाहू

* मोबाइलमधील प्ले स्टोअरमध्ये जा.
* प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा.
* यानंतर सेटिंग पर्यायावर क्लिक करा.
* सगळ्यात वर असणाऱ्या Generalवर क्लिक करा.
* खाली स्क्रोल करा आणि Automatically Archive Apps ऑन करा.

एकदा तुम्ही हे फीचर एनेबल केले की, तुमच्या फोनवरील न वापरलेले ॲप्स अर्काइव्ह केले जातील. कोणतीही महत्त्वाची फाईल डिलीट न करता तुम्ही तुमच्या फोनचे स्टोरेज अगदी सोप्या पद्धतीने खाली करू शकता. अनेकदा निरनिराळ्या ॲप्समुळे स्मार्टफोन भरून जातो आणि काही वेळी नेमका महत्त्वाच्या कामावेळी अडथळा निर्माण होतो. तेव्हा वर सांगितलले फीचर वापरून पहा.

# विनोदी अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे

आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या हृदयावर राज्य करणारा अभिनेता म्हणजे लक्ष्मीकांत बेर्डे उर्फ लक्ष्या. विनोदाचा उपजात कौशल्य आणि अचूक टाइमिंग हे लक्ष्याचे वैशिष्ट्य. ते विनोदी अभिनेते म्हणून जरी जास्त प्रसिद्ध असले तरी कित्येक चित्रपटांमधून त्यांनी गंभीर भूमिकासुद्धा अगदी तंतोतंत वठवल्यात. विनोदी भूमिकांमध्ये त्यांनी महारत प्राप्त केली होती. म्हणून आयुष्यभर ते विनोदी अभिनेता म्हणूनच ओळखले गेले. त्यांचा आज स्मृतिदिन...



## निमित्त

लक्ष्मीकांत बेर्डे यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी रत्नागिरी येथे झाला. लक्ष्या हा त्याच्या पाच भावंडांपैकी एक. आपल्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी त्यांनी लहानपणी लॉटरीची तिकिटेसुद्धा विकली आहेत. खेरवाडी येथील युनियन हायस्कूल या शाळेतून त्याचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर भवन्स या महाविद्यालयातून पदवी मिळवली. आपल्याला विश्वास बसणार नाही,

गणेशोत्सवातील कार्यक्रमातून अभिनयाचा एक छोटासा प्लॅटफॉर्म त्यांना मिळाला आणि ते आपल्या भूमिका साकारू लागले. त्यानंतर शाळा आणि कॉलेजमधून त्यांनी बऱ्याच नाटकांत कामे केली.

नाटकांमध्ये सगळे व्यवस्थित चालू असले तरी त्यांना चित्रपटात काम करण्याची तीव्र इच्छा होती. ती लेक चालली सासरला या चित्रपटाच्या रूपात. हा त्यांचा पहिला चित्रपट,जो तितकेसे व्यवसायिक यश देऊ शकला नाही. त्यामुळे लक्ष्मीकांत यांची परिस्थिती मर्यादितच राहिली. प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक महेश कोठारे यांनी लक्ष्याचा अभिनय पाहून आपल्या दे दणादण या चित्रपटामधून त्याला सहाय्यक अभिनेत्याची भूमिका करण्याची संधी दिली. मिळालेल्या संधीचा सोने करणार नाही तो लक्ष्या कसला. हा चित्रपट आणि लक्ष्या दोघेही सुपरहिट ठरले. महेश कोठारे यांच्या धूमधडाका या चित्रपटात त्यांनी अशोक सराफ व स्वतः कोठारे यांच्यासोबत भूमिका केली आणि अभिनयाचे बरेच दरवाजे त्यांच्यासाठी उघडले गेले. या चित्रपटाने अभूतपूर्व यश मिळवले. एक धमाल विनोदी अभिनेता म्हणून लक्ष्मीकांत जनमानसात ओळखले जाऊ लागले. लहान मुलांपासून ते अगदी वृद्धांपर्यंत सर्वजण त्यांचा अभिनय पाहून अगदी पोट धरून हसत होते. सचिन पिळगावकर दिग्दर्शित अशी ही बनवाबनवी या चित्रपटातील त्यांची साडी नेसून साकारलेली विनोदी भूमिका प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडून गेली.

लक्षाच्या यशात रूही बेर्डे यांचा सिंहाचा वाटा आहे, पण नियतीला हा विवाह जास्त काळ मान्य नव्हता. त्यांची कायमची ताटातूट झाली ती रूईच्या निधनाने. १९९८मध्ये रुही बेर्डे यांचे निधन झाले. यानंतर त्यांनी लग्न केले ते अभिनेत्री प्रिया अरुण यांच्याबरोबर. मृत्यूपूर्वी लक्ष्मीकांत बेर्डे यांनी आपल्या मुलाच्या नावाने अभिनय आर्ट प्रोडक्शन सुरू केले होते. बेर्डे यांना अभिनय आणि स्वानंदी नावाची दोन मुले आहेत. लक्ष्मीकांत यांचे १६ डिसेंबर २००४ रोजी अकाली निधन झाले. त्यांची आठवण नकळत डोळ्याच्या कडा पाणून गेल्याशिवाय राहत नाही. **(साभार : मराठी दुनिया)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# गर्भधारणेसाठी महिलांमध्ये 'हे' व्हिटॅमिन आवश्यक

व्हिटॅमिन डीची कमतरता शरीरासाठी चांगली नाही हे सर्वांनाच माहिती आहे, परंतु त्याचा गर्भधारणेशी थेट संबंध आहे. पोषणतज्ज्ञ पूजा (अजवानी) जैस्वालिन यांनी व्हिटॅमिन डी गर्भधारणेसाठी महत्त्वाचे असले तरीही त्याचे योग्य प्रमाण असणं गरजेचं आहे, असे म्हटले आहे.



खराडी येथील मदरहूड हॉस्पिटलच्या सल्लागार, प्रसूतीतज्ज्ञ आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मानसी शर्मा यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली. त्या सांगतात की, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेचा संबंध हार्मोनल असंतुलनाशी जोडलेला आहे, ज्यामुळे प्रजनन आणि गर्भधारणेच्या परिणामांवर परिणाम होऊ शकतो.

कॅल्शियम आणि फॉस्फरसचे शोषण आणि चयापचय यासाठी व्हिटॅमिन डी आवश्यक असल्यामुळे निरोगी गर्भधारणेसाठी पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन डीची पातळी महत्त्वपूर्ण आहे. कॅल्शियम शोषण, रोगप्रतिकारक शक्तीचे आरोग्य आणि पेशींच्या वाढीसह विविध शारीरिक कार्यांसाठी व्हिटॅमिन डी महत्त्वपूर्ण आहे. गर्भवती महिलांसाठी माता आणि गर्भाच्या आरोग्यासाठी पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन डीचे प्रमाण विशेषतः महत्त्वाचे आहे. अनेक अभ्यासांमध्ये कमी सीरम व्हिटॅमिन डी पातळी आणि विशिष्ट प्रकारचे कर्करोग, ऑटोइम्यून रोग, न्यूरोलॉजिकल रोग, इन्सुलिन प्रतिरोधकता आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोगांचा वाढता धोका यांच्यातील संबंध सूचित करतात, असे डॉ. शर्मा म्हणाल्या.

मदरहूड हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबईतील सल्लागार पोषण आणि आहारतज्ज्ञ डीटी आरती सिंग यांनी सहमती दर्शवली आणि नमूद केले की, गर्भधारणेदरम्यान पौष्टिक कमतरता, विशेषतः व्हिटॅमिन डीची कमतरता सामान्य आहे. आहारतज्ज्ञ आरती सिंग पुढे सांगतात की, गर्भधारणेदरम्यान व्हिटॅमिन डीची पातळी कमी झाल्यास मधुमेह आणि गर्भपाताचा धोका होऊ शकतो. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेसाठी अनेक घटक कारणीभूत ठरू शकतात. यामध्ये सूर्यप्रकाशाचा मर्यादित संपर्क, खराब आहाराच्या सवयी, लठ्ठपणा आणि काही वैद्यकीय परिस्थितीचा समावेश आहे. गर्भधारणेदरम्यान व्हिटॅमिन डीची सामान्य पातळी ३० एनजी/एमएल किंवा त्याहून अधिक असावी. व्हिटॅमिन डीची ही सामान्य पातळी राखून तुम्ही निरोगी गर्भधारणा करू शकता. यासाठी भाज्या, दुग्धजन्य पदार्थ, फळे, नट आणि दूध, दही, पनीर, फॅटी मासे, अंडी आणि मशरूम यांसारख्या व्हिटॅमिन डीच्या पुरेशा प्रमाणात समृद्ध असलेले अधिक पदार्थांचे सेवन करा.

# चक्क समुद्रकिनारी पर्यटकाचे लग्न!

## श्रीवर्धन तालुक्यातील कोंडविल येथील प्रकार; प्रशासन अनभिज्ञ

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील कोंडविल समुद्रकिनारी एका पर्यटकाने. पुण्याहून मंडपाचे सर्व साहित्य सोबत आणून कोंडविल समुद्रकिनारी असलेल्या सिल्वर सेंड हॉटेलच्या समोरच्या समुद्रकिनाऱ्यावर वाळूमध्ये मंडप व स्टेज उभारून आपल्या निकटवर्तीयाचे लग्न लावण्यात आले आहे. लग्नासाठी आलेल्या वधू-वरांची राहण्याची व्यवस्था समोरच असलेल्या हॉटेल सिल्वर सेंड या ठिकाणी करण्यात आल्याची खात्री पूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. अशाप्रकारे समुद्रकिनारी लग्न विवाह सोहळा पार पडताना श्रीवर्धन तालुक्याच्या स्थानिक प्रशासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी सदर व्यक्तींनी घेतलेली नाही.



स्थानिक ग्रामपंचायत, स्थानिक तलाठी यांच्याकडूनदेखील कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नसल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. हिंदू धर्माच्या चालीरीतीप्रमाणे आपल्या घरातील मुलाबाळांचा विवाह पूर्वीच्या काळी घराच्या अंगणामध्ये लावला जात असे. सध्याच्या नवीन संस्कृतीनुसार हॉल घेऊन किंवा लॉन घेऊन विवाह पार पडला जातो. परंतु या ठिकाणी हा घडलेला प्रकार महाराष्ट्रात पहिलाच प्रकार असेल की समुद्रकिनाऱ्यावरील वाळूमध्ये मंडप व स्टेज उभारून लग्न लावण्यात आले.

समुद्रकिनाऱ्यावरील वाळूवरती भव्य दिव्य असे स्टेज व मंडप उभा करून लग्न लागत असताना श्रीवर्धन तालुक्यातील प्रशासनाला कानो कान खबर नव्हती. ही गोष्ट देखील अत्यंत महत्त्वाची आहे. श्रीवर्धन तालुक्यातील समुद्र किनारे हे अत्यंत संवेदनशील मानले जातात. १९९३ साठी मुंबई साखळी बॉम्बस्फोटात वापरण्यात आलेले आरडीएक्स हे घातक स्फोटक सदर लग्न मंडपाच्या ठिकाणापासून केवळ दोन किलोमीटर अंतरावरती उतरविण्यात आले होते.

या वेळी लहान मोठ्या प्रमाणात श्रीवर्धन परिसरात स्मगलिंग चालत असे. परंतु या स्मगलिंग बाबत स्थानिकांना फारशी माहिती नसल्यामुळे त्याचाच फायदा बॉम्बस्फोट घडविणाऱ्यानी मुंबईसारख्या एका महानगरामध्ये, देशाच्या आर्थिक राजधानी मध्ये देशविरोधी कृत्य करून बॉम्बस्फोट घडविण्यात आले. यामध्ये श्रीवर्धन तालुक्याचे नाव देखील मोठ्या प्रमाणावर बदनाम झाले

आता लग्न समारंभासारखा सोहळादेखील पैसे वाचवण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावर मंडप बांधून करण्यात येत असेल. तर या ठिकाणी राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना समुद्र मोकळाच आहे. असेच म्हणावे लागेल. दिवसेंदिवस पुणेसारख्या शहरातून येणाऱ्या पर्यटकांमुळे या ठिकाणचे पर्यटन वाढत असले तरी गैरप्रकारात देखील मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.

श्रीवर्धनचे तहसीलदार, श्रीवर्धनचे गटविकास अधिकारी, श्रीवर्धन चे पोलीस निरीक्षक,श्रीवर्धनच्या उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी या प्रकरणी चौकशी करून संबंधित लग्न समारंभ पार पाडणारे व लग्न समारंभ पार पाडण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या हॉटेल मालकालादेखील जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. याबाबत संबधित ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक व स्थानिक तलाठी यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी फोन घेतला नाही. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया मिळाली नाही.

# वाशी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच कोमल म्हात्रे यांचा भाजपत प्रवेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वाशी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच कोमल भाई म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य माधवी केतन पाटील यांनी रविवारी (दि. १४) भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

भाजप राज्य परिषद सदस्य गिरीश तुळपुळे यांनी भाजपची शाल व पुष्पगुच्छ देऊन उपसरपंच कोमल म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य माधवी केतन पाटील यांचे भाजपमध्ये स्वागत केले. भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, रायगड जिल्हा चिटणीस श्रीकांत पाटील, सरपंच संदेश ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य परशुराम पाटील व रिया राकेश पाटील, राकेश पाटील या वेळी उपस्थित होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी सर्वसामान्यांच्या हितासाठी, पारदर्शक प्रशासनासाठी व सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे, कोमल म्हात्रे व माधवी पाटील यांनी सांगितले.

ग्रामविकास, मूलभूत सुविधा, युवकांना रोजगार, महिला सक्षमीकरण तसेच ग्रामीण भागातील सर्वांगीण प्रगतीसाठी भारतीय जनता पक्षाचे कार्य प्रभावीपणे पोहचवण्यासाठी नव्याने प्रवेश केलेले सर्व लोकप्रतिनिधी सक्रिय योगदान देतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन

**मुरुड : प्रतिनिधी**

कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय , मुरुड यांचे तर्फे राष्ट्रीय सेवा योजना श्रम संस्कार निवासी शिबीर तेलवडे येथे दि .१६ डिसेंबर ते २२ डिसेंबर २०२५ प्राचार्य डॉ. जे. के कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले आहे . सदर शिबीरात एडस जन जागृती, सहकारातील संधी , शेतकरी वर्गासाठी शासन योजना , आपत्ती व्यवस्थापन, शासकीय योजनांची माहिती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन , स्वच्छता अभियान व जैववैविध्दता या विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

## आवासमध्ये नेटवर्क ऑफ द पास्ट थीमवर आधारित कलासंग्रहाचे प्रदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबई येथे नेटवर्क ऑफ द पास्ट : अ स्टडी गॅलरी ऑफ इंडिया अँड द एन्शंट वर्ल्ड हे नवीन दालन कला व इतिहास प्रेमींसाठी १२ डिसेंबर रोजी खुले करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी अलिबाग येथील बाबासाहेब नाजरे हायस्कूल व जुनिअर कॉलेज, आवास येथे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे म्युझियम ऑन व्हील्स हे फिरते वस्तू संग्रहालय दाखल झाले होते.या फिरत्या वस्तू संग्रहालयात नेटवर्क ऑफ द पास्ट या थीम वर आधारित कलासंग्रहाचे प्रदर्शन पाहण्याचा शाळेतील व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.



# वाळण येथील माजी विद्यार्थ्यांची अलिबागच्या कुलाबा किल्ल्याला भेट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाड तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल वाळण येथील १९८८-८९ च्या बॅचमधील काही माजी विद्यार्थ्यांनी रविवार दि.१४ डिसेंबर रोजी अलिबाग येथील कुलाबा किल्ल्याला भेट दिली.



याभेटी दरम्यान ॲड.कैलास पवार, उद्योजक प्रशांत कालगुडे, माजी सैनिकचंद्रप्रकाश ओमले, प्रकाश जाधव, रविंद्र कालगुडे, श्री.गंगाराम गोडावळे,विक्रम उत्तेकर,विठ्ठल बेंदुगडे, शांताराम कालगुडे, वाहन चालक संदिप नरे आदि उपस्थित होते.

जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग येथे कार्यरत असलेले बेंदुगडे यांच्या विनंतीस मान देवून सर्व माजी विद्यार्थी अलिबाग येथे कुलाबा किल्यास भेट देण्याकरिता आले होते. त्यानुसार त्यांनी अलिबाग येथील विविध ठिकाणच्या बीच, पर्यटन स्थळाला भेट दिली

यावेळी ॲड.कैलास पवार म्हणाले की, आम्ही सर्व मित्रांनी सामाजिक बांधिलकी हे तत्व सुरुवातीपासून अंगीकारले आहे. जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम घेण्याची तयारी या गुणांचे बाळकडू आम्हाला लहान वयातच आई-बाबांकडून मिळाले होते.

त्यामुळे जीवनातील संघर्षाला तोंड देत असताना आपल्या अंतरमनात शिक्षणाविषयीची आस जागृत ठेवत सर्व मित्र विविध क्षेत्रात कार्य करीत आहेत. सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, सकारात्मक विचारसरणी, कठोर परिश्रम घेण्याची तयारी, प्रामाणिकपणा,अचूक निर्णय क्षमता, कर्तव्यनिष्ठा, श्रध्दा या गुणांमुळे समाज जीवनातील यशाची अनेक शिखरे आम्ही पादाक्रांत केली आहेत. सर्व माजी विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात विविध विषयांवर आपली मनोगते व्यक्त केली.

# मोरे महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची क्षेत्रभेट

**रोहे : प्रतिनिधी**

एम.बी.मोरे फाउंडेशनचे सौ. वरदा सुनिल तटकरे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव- रोहा येथील विद्यार्थिनींनी शनिवार १३ डिसेंबर रोजी 'शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्स'अंतर्गत इतिहास, भूगोल, वनस्पतीशास्त्र विषयनिहाय गांधारपाले लेणी, चवदार तळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड, अविष्कार नर्सरी, माणगाव या स्थळांचे प्रत्यक्ष अध्ययन केले.




या एकदिवसीय क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थिनींनी सर्वप्रथम माणगावमधील 'अविष्कार नर्सरी'तील कर्मचारी संतोष मालूष्टे यांच्याकडून वनस्पतीच्या विविध प्रजातीची माहिती घेतली. त्यानंतर मार्गदर्शक प्राध्यापकांकडून महाडमधील गांधारपाले या ठिकाणी बौद्धधर्मीय कंभोज वंशातील राजा विष्णू पुलित यांच्या कारकीर्दित ई.स. १३० मध्ये निर्माण केलेल्या लेण्यांचा इतिहास विद्यार्थिनींनी जाणून घेतला. लेणी कोरण्यासाठी वापरलेल्या खडकाची वैशिष्ट्येदेखील भूगोल विषयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थिनींना सांगितली. भेटीत पुढील महाडमधील चवदार तळे या ऐतिहासिक स्थळावर विद्यार्थिनींनी सर्वेक्षण केले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाबद्दल देखील विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली.

या क्षेत्रभेटीत महिला महाविद्यालयातील ३८ विद्यार्थिनी आणि यांसह प्रा. माधुरी जाधव, प्रा.दीपाली वारंगे, प्रा. दर्शना शिंदे, प्रा. अक्षता ठाकूर सहभागी झाल्या.

Buildspace Enterprises LLP
Project Management Consultancy (PMC)
SELF- REDEVELOPMENT / REDEVELOPMENT
For Housing Societies in Navi Mumbai/ Panvel/Raigad Region
Office Address: Nagarpalika Complex, 1st Floor, Office no.138 Near Phadke Natyagruha,Panvel,410206.
Phone: 9324202010 / 9322652319
Email: buildspacellp@gmail.com

# स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तर यांना अभिवादन



देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात अनेक महापुरुषांनी आपले योगदान दिले. कर्जतमधील क्रांतिकारक राघो नागो भगत तथा भगत मास्तर हेही स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होते. त्यांना अभिवादन करण्यात आले.

**कर्जत : प्रतिनिधी**

१९४२च्या स्वतंत्र लढ्यात सहभागी झालेले कर्जत तालुक्यातील अवसरे येथील क्रांतिकारक राघो नागो भगत तथा भगत मास्तर यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन केले आहे. भगत मास्तर यांना यावेळी अवसरे येथील समाधीजवळ कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांच्याकडून अभिवादन करण्यात आले.

मार्गशीर्ष वद्य एकादशी या दिवशी स्वतंत्रसैनिक राघो नागो भगत यांचे निधन झाले होते. त्यांची पुण्यतिथी दरवर्षी भगत मास्तर प्रतिष्ठानच्या सभागृहात साजरी केली जाते. या प्रतिष्ठानचे अध्यक्ष भरत भगत यांच्याकडून दरवर्षी तीन दिवसांचा अखंड नामयज्ञ सोहळा आयोजित केला जातो.

या सोहळ्याला सुरुवात झाली असून १४ ते १६ डिसेंबर या कालावधीत हा सोहळा अवसरे येथील भगत मास्तर स्मारक येथे साजरा होत आहे. भगत मास्तर यांच्या पुण्यतिथी निमित्त कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांनी एकत्र येत अभिवादन केले. सुरुवातीला इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे यांनी स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तर यांच्या कार्याची महती सांगितली.

यावेळी भगत मास्तर यांचे पुत्र भरत भगत, शिवनाथ बाबा तसेच आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, भगवान धुळे, शिवाजी कराळे, सचिव जितेंद्र गवळी, भूषण पेमारे, सूर्यकांत चंचे, मनोहर हजारे, अर्जुन तरे, संतोष धुळे, संजय यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

**परिशिष्ट क्र. १६**

(उपविधी क्र. ३५ अन्वये)

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**

**नोटीस**

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा / बंगला क्र. ...... धारण करणाऱ्या **श्री. प्रभाकर बाबाजी पाटील** यांचे तारीख २५/११/२०२५ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/ हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२:०० वा. ते दुपारी ४:०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण : नवीन पनवेल**
**दिनांक : १५/१२/२०२५**

**सही/-**
**सचिव**
सरकारी नोकर... सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नवीन पनवेल

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मी अध्यक्ष-मौनुद्दीन उमरखान अधिकारी, रा. एम. के. कॉर्नर को ऑफ, हौ. सो. लि., सी. टी. सर्व्हे नं. १११९, वाजीमोहल्ला, ता. पनवेल, जि. रायगड. या नोटीशीद्वारे सुचित करतो की, आमची सोसायटी नामे एम. के. कॉर्नर को. ऑप. हौ. सो. लि., सी. टी. सर्व्हे नं. १११९ वर सोसायटीची उभी असलेली इमारत जुनी व धोकादायक असल्यामुळे आम्ही सदरची इमारत ही पुर्न:विकसनासाठी एका चांगल्या विकासकास दिलेली आहे. आमच्या सोसायटीमधील गाळा क्र. ३ व ४ हे कै. वसंत गोविंद शिंदे यांच्या मालकीचे आहेत. संदर गाळा क्र. ३ व ४ हे कै. वसंत गोविंद शिंदे यांच्या मालकीचे असुन कै. वसंत गोविंद शिंदे हे मयत झालेले आहेत. त्यांच्या वारसां संबंधीत ज्या व्यक्ती असतील त्यांनी त्यांच्या कायदेशीर वारस दाखल्याच्या कागदपत्रासह सोसायटीमधील कार्यालयाशी संपर्क साधावा.

आमची एम. के. कॉर्नर को. ऑप. हौ. सो. लि., सी. टी. सर्व्हे नं. १११९, वाजीमोहल्ला, ता. पनवेल, जि. रायगड. ही सोसायटी विकसनासाठी आम्ही दिलेली आहे. कै. वसंत गोविंद शिंदे यांच्या मालकीचे आमच्या सोसायटी मधील गाळा क्र. ३ व ४ या गाळ्या संदर्भात नवीन बांधण्यात येणाऱ्या इमारतीमध्ये विकासक इतर गाळे धारकांना जो मोबदला दिलेला आहे तो मोबदला हा गाळा क्र. ३ व ४ यांना देखील देण्याचे मान्य केलेले आहे. कै. वसंत गोविंद शिंदे यांच्या मालकीचे आमच्या सोसायटी मधील गाळा क्र. ३ व ४ या मिळकती संदर्भात त्यांच्या वारसांनी योग्य ते कागदपत्र घेऊन या नोटिशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या वारसांबाबत योग्य ते कागदपत्र दाखवून, सोसायटीस त्यांच्या वारसांबाबत खात्री पटवून देण्याची आहे व विकसनाबाबतीत काही तक्रारी, हरकती असतील तर, त्या लेखी हरकती खालील पत्त्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहीत मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती संदर्भात कै. वसंत गोविंद शिंदे यांच्या वारसांच्या कोणत्याही हरकती नाहीत असे गृहित धरुन आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित सोसायटीचा पुर्न:विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस सोसायटी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ठिकाण: पनवेल
दिनांक: १५/१२/२०२५

**सही/-**
**मौनुद्दीन उमरखान अधिकारी**
एम. के. कॉर्नर को. ऑप. हौ. सो. लि., सी. टी. सर्व्हे नं. १११९, वाजीमोहल्ला, ता. पनवेल, जि. रायगड.

**ग्रामपंचायत वहाळ**

कार्यालय-मु. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड.

**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत वहाळ ग्रामपंचायत हद्दीतील खालील विकास कामे करण्याकरिता विहित मुदतीमध्ये नोंदणीकृत ठेकेदाराकडून मोहोरबंद पाकिटात निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्या सिलबंद निविदा दिनांक १६/१२/२०२५ ते २३/१२/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | टेंडर फॉर्मची रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत वहाळ हद्दीत मौजे बामणडोंगरी मुख्य रस्त्यापासून तुकाराम भोईर यांच्या घरापर्यंत रस्ता सिमेंट काँक्रीट करणे. | ७००००० /- | ७००० /- | ५०० /- | ३ महिने |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

१) वरील कामाच्या निविदा मोहरबंद पाकिटात मा. सरपंच ग्रामपंचायत वहाळ यांचे नावे दिनांक २३/१२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येईल.
२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.
३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २४ /१२/२०२५ रोजी १.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांच्या समक्ष उघडण्यात येईल.
५) कोणत्याही नामंजुर निविदेसंदर्भात ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
६) सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

दिनांक : १५/१२/२०२५

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत वहाळ
ता. पनवेल, जि. रायगड.

**सही/-**
**सरपंच / प्रशासक**
ग्रामपंचायत वहाळ
ता. पनवेल, जि. रायगड.

# वाशी विभागात अतिक्रमणांवर कारवाई

## पालिकेने वसूल केला चार लाखांचा दंड

**नवी मुंबई : बातमीदार**

पालिकेकडून सध्या अतिक्रमणांवर धडाकेबाज कारवाई सुरू आहे. वाशी विभागातदेखील फेरीवाल्यांसह, अतिक्रमणांवर कारवाई सुरू केली आहे. विभाग अधिकारी सुखदेव येडवे यांच्या उपस्थितीत मार्जिनल स्पेस वापरत असलेल्या अनेक दुकानांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत चार लाख १० हजारांचा दंड एकाच दिवसात वसूल करण्यात आला.



वाशी विभाग कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सेक्टर ९, १०, १५, १७, मधील अशी सामासी जागा वापरणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाईचा धडाका लावला आहे. या कारवाईत कपडे, भांडी, फूड स्टॉल, पुतळे, चप्पल व फर्निचर लावलेल्या दुकानदारांवर कारवाई करण्यात आली.

या कारवाई आधी संपूर्ण वाशी विभाग परिसरात ध्वनिक्षेपणावरून अनेक व्यापाऱ्यांना समाज देण्यात आली होती. अनेक व्यापाऱ्यांनी या प्रतिसाद दिला. मात्र, नियम धुकडकावणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला.

**व्यवसायिक आस्थापनांकडून सामासी जागांचा वापर जोपर्यंत पूर्णतः बंद होत नाही तोपर्यंत अशीच दंडात्मक कारवाई रोज करण्यात येईल तरीही सर्व व्यापाऱ्यांनी सामासी जागेचा वापर टाळावा असेच आवाहन सर्व व्यापाऱ्यांना करण्यात येत आहे.**

**–सुखदेव येडवे, सहाय्यक आयुक्त, वाशी विभाग कार्यालय**

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील सुशोभीकरण कामांना वेग

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबरपासून व्यावसायिक विमानांची सेवा सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने विमानतळ परिसरातील रंगरंगोटी आणि रस्ते सुशोभीकरणाच्या कामांना वेग आला आहे.

विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावरील भिती, कम्पाउंड वॉल, फ्लायओव्हरखालील पॅनेल्स आणि रस्त्यालगतच्या संरचना नव्या डिसेंबरपासून व्यावसायिक विमानांची रंगसंगतीत नटविल्या जात आहेत. सिडकोने मुख्य कॉरिडॉरवर 'थीम-बेस्ड' भित्तिचित्रे, कलात्मक पेंटिंग आणि स्वच्छ, एकसंध लूक देणाऱ्या रंगकामाची निवड केली आहे. विमानतळाकडे जाणाऱ्या उलवेतील मुख्य मार्गावरील दुभाजक, पदपथ, दिशादर्शक फलक आणि पथदिव्यांच्या रंगरंगोटीची कामे पूर्ण झाली आहेत. रस्त्याच्या रेखांकन पट्टांचे नूतनीकरणही



केले जात आहे. फ्लायओव्हरचे खांब, बस टॅक्सी ड्रॉप पॉइंट परिसर आणि भुयारी मार्गांना एकसंध रंगछटा देऊन विमानतळ परिसराचे सौंदर्य वाढविले जात आहे.

रात्रीच्या वेळी या कामांना अधिक गती देण्यात आली आहे. २५ डिसेंबरपूर्वी संपूर्ण परिसर स्वच्छ, आकर्षक आणि प्रवासी-अनुकूल दिसावा यासाठी अंतिम टचअपची कामे युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.



# फुंडे येथील वाजेकर विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता बारावी कला शाखेची विद्यार्थी-शिक्षक-पालक सभा शुक्रवारी (दि.१२) रोजी प्राचार्य बबन साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेस स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू प्रमुख उपस्थितीत सभा झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दि रयत सेवक को-ऑप. बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थी-शिक्षक-पालक सभेचे महत्त्व स्पष्ट करून आगामी बोर्ड परीक्षेच्या तयारीसंबंधी मार्गदर्शन केले.

सभेत प्रा. सरोदे यांनी निकालपत्रकाचे वाचन केले. प्रा. बाबुलाल पाटोळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घरगुती वातावरण, पालकांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांची आवश्यकता अधोरेखित केली.

प्राचार्य बबन साळुंखे यांनी विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे विवेचन करत विद्यार्थ्यांना अभ्यासातील नियमिततेचे महत्त्व पटवून दिले. स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू यांनी विद्यालयाच्या उज्ज्वल निकालांची परंपरा कायम राखण्यासाठी शिस्त, वेळपालन आणि कठोर परिश्रम या तीन घटकांवर भर द्यावा, असे सांगितले.

या सभेस उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, परशुराम कदम, सविता म्हात्रे यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेअर मार्केटमध्ये आमिष दाखवून २१ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**




गुंतवणूक केलेल्या रकमेवर कोणताही नफा आणि गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सहा अनोळखी व्यक्तींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुजवा चक्रवर्ती हे कळंबोली, सेक्टर १६ येथे राहत असून ते फिल्म इंडस्ट्रीमध्ये पोस्ट प्रोडक्शन मार्केटिंग करतात. त्यांना शेअर मार्केट ट्रेडिंग संदर्भात जाहिरात दिसली. त्या लिंकवर क्लिक केले असता त्यांना व्हॉट्सअॅप ग्रुपवर अॅड करण्यात आले. ट्रेडिंग करायचा असल्यास अॅपवर पैसे टाकावे लागतील असे सांगितले. त्यावेळी त्यांनी पैसे गुंतवले आणि ट्रेडिंग सुरू केली. त्यांना १० हजार रुपयांचा फायदा झाला. त्यानंतर त्यांनी २५ हजार रुपये पाठवले आणि त्यांना एक लाख रुपये नफा मिळाला.

चांगला परतावा मिळत असल्याने ठेवला विश्वास पैसे अकाउंटवर येतात का हे पाहण्यासाठी त्यांनी बँक खात्यावर रक्कम ट्रान्सफर केली. ते त्यांच्या बँक खात्यावर दिसले. त्यामुळे त्यांचा विश्वास वाढला आणि त्यांनी आणखी पैसे ट्रान्सफर केले. त्यांना लाखांचा नफा दिसत होता. त्यांनी एकूण २१ लाख ७४ हजार रुपये जमा केले असता अॅपवर एक कोटी रुपये दिसून आले. त्यानंतर त्यांनी पैसे ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला, मात्र ते ट्रान्सफर झाले नाहीत. त्यावेळी तुम्हाला १० लाख रुपये ३ कमिशन भरावे लागेल, त्यानंतर ते पैसे खात्यावर जमा होतील असे सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तळोजा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रीनुसार गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे.

# बजरंग दलाचे ऐरोलीत भव्य शौर्य संचलन

**नवी मुंबई : बातमीदार**

बजरंग दल नवी मुंबईच्या वतीने 'नशामुक्त युवा, विकसित भारत अभियान' पार पडले. यामध्ये बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी नशामुक्ती साठी लोकवस्ती, शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्टेशन अशा प्रमुख ठिकाणी जनजागृती अभियान केले.



गीता जयंतीच्या निमित्ताने प्रत्येक वर्षी बजरंग दलाचे शौर्य संचलन आयोजित करण्यात येते. शौर्य संचलनात बजरंग दलाचे कार्यकर्ते गणवेशात घोषाच्या तालावर शिस्तबद्ध संचलन करतात. यावर्षी ठाणे विभागाचे एकत्रित शौर्य संचलन रविवारी (दि.१४) ऐरोली येथे आयोजित करण्यात आले होते. दुपारी ४ वाजता विठ्ठल सुतार मैदान, सेक्टर २० ऐरोली येथून हे संचलन सुरू झाले. गावदेवी मैदान, ऐरोली येथे संचलनाचा समारोप झाला. या शौर्य संचलनात एकूण ७९१ कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. संचलन समारोपाच्या नंतर गावदेवी मैदान, ऐरोली येथे संतांचे आशिर्वचन व प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शन होऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

सुत्रसंचलन बजरंग दल नवी मुंबई जिल्हा संयोजक शंकर संगपाळ, प्रास्तविक ठाणे विभाग संयोजक अमरजीत सुर्वे, आभार प्रदर्शन नवी मुंबई जिल्हा मंत्री स्वरुप पाटील यांनी केले. या कार्यक्रमात कबीर मठ ठाणे महंत महावीर दास महाराज, ह.भ.प भजनरत्न महादेव बुवा शहाबाजकर, ह.भ.प लक्ष्मण महाराज पांचाळ, ह.भ.प सुनील महाराज रानकर, ह.भ.प पंडित महाराज वर्पे, विश्व हिंदू परिषद ठाणे विभाग मंत्री मनोज शर्मा, सहमंत्री आशुतोष तिवारी, विश्व हिंदू परिषद नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष अशोक भन्साली, उपाध्यक्ष डॉ. अतुल नाईक, जिल्हा सहमंत्री श्याम मोहनन, मातृशक्ती प्रमुख नयना शेट्टी, दुर्गा वाहिनी सहसंयोजक अंकिता चाळके, कळवा मुंब्रा जिल्हा मंत्री रवींद्र पाटील, बजरंग दल संयोजक गिरीश पाटील, अनुप पांडे, विजय पांडे, बजरंग दल सहसंयोजक अरुण पाटील, तेजस पाटील, संदीप पाल, योगेश सिलवेरू, संजीव रावत आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात रविवारी क्षितिज वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. नेहमीच नाविण्याचा ध्यास घेणाऱ्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात क्षितिज गीतामृत ही थीम घेवून वार्षिक स्नेहसंमेलन सादर केले गेले. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सतत प्रयत्न करणाऱ्या या विद्यालयात क्षितिज-गीतामृत या थीम अंतर्गत विविध विषयांवर नृत्याविष्कार सादर केले गेले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून विजयभूमी विद्यापिठाचे उप कुलगुरु डॉक्टर रविकेश श्रीवास्तव, टाईम्स ऑफ इंडियाचे प्रमुख हर्षित दोशी, संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, संस्थेचे व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, वैशाली देशमुख, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, परेश ठाकूर, वर्षा ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे, प्राचार्य निशा नायर, रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष खांदेकर आदी उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राजस्थान सफर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता सहावी ते दहावी विद्यार्थ्यासाठी पाच दिवसीय शैक्षिणक सहलीचे आयोजन ५ डिसेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत करण्यात आले होते. एकूण २९ विद्यार्थी आणि तीन शिक्षक या सहलीमध्ये सहभागी झाले होते.

राजस्थान येथे आयोजित करण्यात आलेल्या या शैक्षणिक सहली मध्ये विद्यार्थ्यांना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या जोधपूर, जैसलमेर आणि सॅम सॅण्ड ड्यून्स या शहरांचा समावेश असलेली ठिकाणे दाखविण्यात आली, ज्यातून विद्यार्थ्यांना वर्गाबाहेरील मौल्यवान ज्ञान मिळाले.

विद्यार्थ्यांनी जिवंत किल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जैसलमेर किल्ल्याची सोन्यासारखी वाळूची रचना व प्राचीन व्यापारी मार्गांवरील त्याचे महत्त्व समजून घेतले. या वेळी विद्यार्थ्यांनी जेलसलमेर किल्ला, पटवा हवेली, आणि सामचे वाळवंट या ठिकाणी भेट दिली. विद्यार्थ्यांनी जैसलमेर वॉर म्युझियमला भेट दिली, जिथे त्यांनी भारताच्या शौर्यपूर्ण सैनिकी इतिहासाची माहिती घेतली. तसेच विद्यार्थ्यांनी मेहरानगड किल्ला, जसवंत थडा आणि उमेद भवन पॅलेस (बाह्य परिसर) यांना भेट दिली.

या सर्व ठिकाणांना भेट देताना विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वज्ञानात असलेल्या माहितीत आणखी भर पडली. ही सहल विद्यार्थ्यांनी अगदी उत्साहाने आणि आनंदाने पार पाडली.

# नेरे शांतीवन येथे सीकेटी व रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे सात दिवसीय निवासी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांद कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालय व खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय योजना विभागातर्फे शांतीवन नेरे येथे आयोजित केलेल्या सात दिवसीय रहिवाशी शिबिराचे उद्घाटन रविवारी (दि.१४) संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, राहुल घरत, कुष्ठरोग निवारण समितीचे चेअरमन प्रमोद ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, बीसीटी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सानवी देशमुख, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक आकाश पाटील, प्रथमेश ठाकूर, मुंबई विद्यापीठाची राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ओसीडी सुशील शिंदे यांच्यासह महाविद्यालयातील विविध शाखांचे विभाग प्रमुख आणि शांतीवन कुष्ठरोगी समिती नेरे येथील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी पनवेलचे न्यायाधीश आर. एम. चव्हाण व सुशील शिंदे (मुंबई विद्यापीठ) यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या सात दिवसीय रहिवाशी शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातील दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थी वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. त्यामध्ये स्वच्छता रॅली, श्रमदान, वेगवेगळे बौद्धिक सत्रे यांचा समावेश आहे. या सात दिवसीय निवासी शिबिराचा राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होणार आहे तसेच एक राष्ट्रीय स्वयंसेवक म्हणून राष्ट्र उभारणीसाठी असणाऱ्या जबाबदाऱ्या ज्ञात होणार आहेत.

या वेळी चांगू काना ठाकूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे चेअरमन प्रा. डॉ. राजेश येवले यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा २०२५-२६ अहवाल सादर केला. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी संचालक परेश ठाकूर यांनी शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील (राष्ट्रीय सेवा योजना विभाग मुख्य कार्यक्रम अधिकारी चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल) यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. प्रथमेश ठाकूर (मुख्य कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना विभाग रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर) यांनी आभार मानले.

# जेएनपीएतर्फे उरणमधील दिव्यांगांना व्यवसायोपयोगी साहित्याचे मोफत वाटप

**उरण : बातमीदार**

भारतामधील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर म्हणून ओळखले जाणारे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमांतर्गत दिव्यांग व्यक्तींसाठी उद्योजकता व उपजीविका विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत दिव्यांग व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने आवश्यक व्यवसायोपयोगी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण व लाहस प्रतिष्ठा, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने जेएनपीए मल्टीपर्पज हॉल उरण येथे झाला.




दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती न देता स्वावलंबनाची संधी देणे ही काळाची गरज आहे. स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक साधने व सक्षम पाठबळ मिळाल्यास दिव्यांग व्यक्ती सन्मानाने उपजीविका करू शकतात आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आत्मविश्वासाने सहभागी होऊ शकतात. अशा उद्योजकतेला चालना देणारे उपक्रम सामाजिक समतेचा पाया अधिक भक्कम करतात. दिव्यांग व्यक्तींना व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर - जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) यांचे मनःपूर्वक आभार दिव्यांग बांधवांनी व्यक्त केले.

कार्यक्रमावेळी रविष कुमार सिंग (उपाध्यक्ष, जेएनपीए - आय आर एस), मनिषा जाधव मॅडम (महाव्यवस्थापिका - प्रशासन व सचिव) यांची प्रमुख उपस्थिती होती. विनय मल्ल-व्यवस्थापक, रवींद्र पाटील जेएनपीए विश्वस्त, यांसह विजय ओझाला (विश्वस्त- लहास प्रतिष्ठान), ज्ञानेश्वर भोईर (प्रमुख-लहास प्रतिष्ठान), प्रतीक्षा फर्डे (समन्वयक), दिव्यांग सामाजिक संघटना उरणचे सर्व शिलेदार, संघटनेचे सल्लागार मदन पाटील, तसेच उरण तालुक्यातील लाभार्थी दिव्यांग बांधव व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात एकूण ४४ व्यवसायोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये २ लॅपटॉप, ११ झेरॉक्स मशीन, २० शिलाई मशीन आणि ११ घरघंटी यांचा समावेश होता. या साहित्यामुळे दिव्यांग व्यक्तींना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा मिळून आत्मनिर्भरतेकडे एक ठोस पाऊल टाकण्यास मदत होणार आहे.

# सैनिक विश्रांतीगृहाला भूतबंगल्याची अवकळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहराच्या मध्यवर्ती भागात, कचेरी रोडलगत विद्यानगरच्या प्रवेशद्वाराजवळ वसलेले सैनिक विश्रांती गृह आज शासनाच्या आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अक्षरशः अखेरची घटका मोजत आहे. एकेकाळी गजबजलेले, शिस्तीचे आणि राष्ट्रसेवेचे प्रतीक ठरलेले हे विश्रामगृह आज मात्र निधीअभावी जीर्णावस्थेत पोहोचले असून त्याला जणू भूतबंगल्याची अवकळा प्राप्त झाली आहे.



गेली अनेक वर्षे या विश्रामगृहाची किमान डागडुजी तरी करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक माजी सैनिक, नागरिक आणि सामाजिक संघटनांकडून सातत्याने केली जात आहे. सैनिक्ब कल्याण विभाग आणि इतर प्रशासकीय यंत्रणांमधील कागदोपत्री नियम, कायदे आणि विभागीय अडथळ्यांमध्ये हा निधी अडकून पडला असून त्याची झळ थेट या ऐतिहासिक इमारतीला सहन करावी लागत आहे. सुमारे पाच वर्षांपूर्वी केवळ संरक्षण भिंती उभारण्यात आल्या, मात्र मूळ सैनिक विश्रांती गृहाच्या नूतनीकरणाचा किंवा पुनर्बांधणीचा प्रश्न तसाच प्रलंबित राहिला. आज या इमारतीच्या परिसरात उंचच उंच झाडे झुडपे, गवत वाढले असून, भिंतींमधील दगड–वीटा ढासळू लागल्या आहेत. खिडक्या–दरवाजे मोडकळीस आले असून छताची आणि भिंतींची अवस्था धोकादायक बनली आहे. कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकेकाळी या सैनिक विश्रांती गृहात सैनिक व पोलिस भरतीसाठी तरुणांची प्रचंड गर्दी होत असे. विविध सामाजिक आणि प्रशासकीय सभा– बैठका येथे पार पडत. माजी सैनिक विश्रांतीसाठी येथे मुक्काम करत असत. आज मात्र तेच विश्रामगृह ओसाड, भयावह आणि उपेक्षित अवस्थेत उभे आहे. ज्या सैनिकांनी देशासाठी आपल्या प्राघणांची पर्वा न करता लढा दिला, काहींनी मातृभूमीसाठी हसत हसत शहिदी पत्करली, काहींनी स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले–त्याच सैनिकांच्या सन्मानार्थ उभारलेली ही इमारत आज प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अखेरची घटका मोजत आहे, हे वास्तव अत्यंत वेदनादायक आहे.

दरवर्षी ९ जानेवारी रोजी देशातील पहिले व्हिक्टोरिया क्रॉस पदक विजेते वीर यशवंतराव घाडगे यांच्या जयंतीनिमित्त विविध लोकप्रतिनिधी आणि अधिकारी येथे भेट देतात. भाषणे होतात, आश्वासने दिली जातात, मात्र त्या आश्वासनांची पूर्तता होत नाही. कार्यक्रम संपतो, फलक काढले जातात आणि पुन्हा या विश्रामगृहाच्या वाट्याला येते ते केवळ अंधार, दुर्लक्ष आणि शांतता. ना चिरा ना पणती अशी अवस्था आज या ऐतिहासिक सैनिक विश्रांती गृहाची झाली आहे.

### पुनरुज्जीवन होणे गरजेचे

देशसेवेचे प्रतीक असलेल्या या वास्तूचे जतन आणि पुनरुज्जीवन होणे, ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून समाजाचीही नैतिक जबाबदारी आहे. अन्यथा इतिहासाच्या पानांत केवळ नोंद राहील की, एकेकाळी सैनिकांच्या सन्मानासाठी उभारलेले विश्रांती गृह प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे काळाच्या पडद्याआड गेले.

## वाशिवलीत रक्तदान शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा आणि सांस्कृतिक, अध्यात्मिक, सुशोभीकरण ग्रामस्थ मंडळ वाशिवली यांच्या संयुक्त विद्यमाने साई ब्लड बँकच्या सहकार्याने पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवली येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात रोटरी क्लबचे अध्यक्ष विजय पाटील, बाळकृष्ण होणावणे, गणेश काळे, जयश्री पाटील, अनुराधा होणावळे मंडळांचे अध्यक्ष व सेक्रेटरी आणि साई ब्लड बँकेच्या वरीष्ठ अधिकारी प्रतिक्षा कुरंगळे यांच्या हस्ते करण्यात आली. रक्तदान शिबिराचे महत्त्व काय याबद्दलची माहिती साळूंके यांनी दिली. शिबिराचा लाभ परीसरातील तरुण वर्गाने जास्त प्रमाणात घेतला.

या शिबिरात ६८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक, अध्यात्मिक, सुशोभिकरण ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष अंकुश ठोंबरे उपाध्यक्ष दिलीप मालकर, संतोष तुपे, सचिव मंदार पाटील, सर्व पदाधिकारी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.



# ‘रोटरी’तर्फे माणगावच्या उपजिल्हा रुग्णालयाला २०० आय लेन्स भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ मुंबई सेंट्रलच्या सहकार्याने क्लब अध्यक्ष आशिष मेहता, संचालक (वैद्यकिय मदत) राजेश शहा,सचिव दिव्या बर्मेच्या आणि माणगांव तालुक्यातील मौजे शिरवली गावचे सुपुत्र संचालक (CSR) दत्ताराम पांडुरंग शिंदे यांच्या माध्यमातून माणगांव उपजिल्हा रुग्णालयाकरिता १३ डिसेंबर रोजी डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी २०० लेन्स भेट देण्यात आले.



या आधीदेखील लागणारे लेन्स व २०२२ मध्ये अत्याधुनिक डोळ्याचे ऑपरेशन मशीन व ऑपरेशनसाठी सियाम मशीन रोटरी क्लब ऑफ मुंबई च्या मार्फत देण्यात आले असून तालुक्यातील अनेक रुग्णांना याचा मोठा फायदा होत असल्याचे डॉ. शंतानु डोईफोडे यांनी सांगितले. या वेळी रोटरी क्लब मुंबई सेंट्रल संचालक दत्ताराम शिंदे, डॉ. शंतनु डोईफोडे, डॉ मेहता, डॉ देशमुख , समाजसेवक संतोष खाडे, नंदकुमार मेहता , जयंत मेहता, सुजित लाखाडे आदी रुग्णालय कर्मचारी उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ मुंबई सेंट्रलचे सन्मानिय पदाधिकारी दत्ताराम शिंदे यांनी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुविधा करिता काही साधने उपलब्ध करून देता येतील याबाबत डॉक्टर यांचे कडून आढावा घेतला होता. या आधी ३०० लेन्स उपजिल्हा रुग्णालयाला देण्यात आल्या होत्या. तसेच अजून लेन्स वर्षभरात उपजिल्हा रुग्णालयाला देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. रोटरी क्लब ही संस्था महानगरी मुंबई शहरात कार्यरत आहे.

ग्रामीण भागात शैक्षणिक व सरकारी रुग्णालयात आवश्यक असणारी साधन व्यवस्था ही त्यांच्या कडून होत असते. या संस्थेच्या माध्यमातून तालुक्यातील सर्वसामान्य लोकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम क्लबच्या माध्यमातून राबवले जातात.

# नागोठणे बसस्थानक पुनर्विकास कामासाठी दोन कोटी ८० हजारांचा निधी

## मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन; आमदार रविशेठ पाटील यांचा पाठपुरावा

**नागोठणे : बातमीदार**

पेण सुधागड मतदारसंघांचे आमदार रविशेठ पाटील यांच्या सततच्या पाठपुरावामुळे महाराष्ट्र शासनाने नागोठणे बसस्थानक पुनर्विकास कामासाठी दोन कोटी ८० हजार निधी उपलब्ध करून दिला असून सोमवारी (दि. १५) या कामाचे भूमिपूजन रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे आणि आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



दरम्यान, ग्रामस्थांना विचारात घेऊन तसेच दर्जेदार कामाच्या सूचना या वेळी ना. गोगावले, ना. तटकरे व आ. पाटील यांनी परिवहन महामंडळ रायगड विभागाच्या अधिकारी वर्गाला केल्या तसेच अधिक निधीची गरज पडल्यास आम्ही आपणास देऊ असे आश्वासन यावेळी दिले.

कार्यक्रमाच्या वेळी व्यासपीठावर ना. भरत गोगावले, ना. अदिती तटकरे, आ. रविंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य किशोर जैन, राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, शिवराम शिंदे, नागोठणे माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, शिवसेना ता. प्रमुख मनोज शिंदे, भाजप नेते मारुती देवरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, ता. अध्यक्ष महेश ठाकूर, शिवसेना विभाग अध्यक्ष प्रविण तडकर, रायगड परिवहन विभाग नियंत्रक डॉ. सुहास चोरे आदी उपस्थित होते.

नागोठणे हे गाव कोकणातील मध्यस्थान असल्यामुळे सुसज्ज बसस्थानक असणे गरजेचे होते त्यासाठी युती सरकारने दोन कोटी ८० लाख निधी मंजूर केला आहे. नागोठणे बसस्थानक पुररेषेत येत असून प्रतिवर्षी जवळजवळ चार फूट पाणी बसस्थानाकात येत असते म्हणून बसस्थानकाची उंची वाढवावी अशा सूचना आमदार रविशेठ पाटील यांनी केल्या. नागोठणे बसस्थानाकासाठी ३ ते ३.५ वर्षांपूर्वी दोन कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आली होती त्यासाठी तत्कालीन आमदार अनिकेत तटकरे यांनी पाठपुरावा केला होता, परंतु त्याकामासाठी स्थागिती आली होती. आता पाठपुरावा करून दोन कोटी ८० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. हे काम करताना पुरपरिस्थितीचा विचार करावा तसेच रस्त्याच्या लेवलने काम करा. स्थानिक पंचायतला विचारात घ्या. सौरक्षण भिंत बांधताना सर्व बाबींचा विचार करा तसेच गाळे स्थानिकांनाच मिळाले पाहिजेत अशा सूचना करून ना. अदिती तटकरे यांनी सांगितले की, नवीन बस आल्या पाहिजेत, बस थांबे वाढले पाहिजेत, बस संख्या वाढली पाहिजे यासाठी आम्ही पाठपुरावा करू. बस स्थानक सुसज्ञ करण्यासाठी पैसे कमी पडू देणार नाहीत. बस स्थानकात पाणी तुंबता कामा नये. ठेकेदारने दर्जे दार काम करावे तसेच हे काम पोलादपूर धर्तीवर झाले पाहिजे अशा सूचना ना. भरत गोगावले यांनी केल्या.

दरम्यान, परिवहन विभागाने नागोठणे बसस्थानक पुनर्विकास कामाच्या भूमिपूजनचे निमंत्रण ग्रामपंचायत सरपंच, सदस्य यांना दिले नसल्यामुळे माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांनी जोरदार नाराजी व्यक्त करून त्यांनी स्वागत स्वीकारले नाही तसेच पत्रकारांना देखील निमंत्रण दिले नसल्यामुळे पत्रकार नाराज झाले याची जाणीव झाल्यानंतर रायगड परिवहन विभाग नियंत्रक डॉ. सुहास चोरे यांनी जाहीरपणे दिलगिरी व्यक्त केली व यापुढे अशी चुक पुन्हा होणार नाही असे सांगितले.

# ‘आहाराबरोबरच व्यायाम आणि योगाला अनन्यसाधारण महत्त्व’

**रोहा : प्रतिनिधी**

निसर्गाचे बदलते हवामान आणि धकाधकीच्या जीवनात आहाराबरोबर व्यायाम आणि योगाला अनन्य साधारण महत्व हे प्रत्येकाने केलेच पाहिजे. असे प्रतिपादन रोहा पोलीस निरीक्षक श्री मारुती पाटील केले

निसर्गाचा समतोल बदलत आहे. बदलते हवामान आणि धकाधकीचे जिवन व खत मिश्रित अन्नधान्याचा आहार यामुळे माणसाची दिवसेंदिवस शारीरिक, मानसिक परिस्थिती बिघडत चालली आहे. या करिता नियमित व्यायाम आणि योगा करणे प्रामुख्याने आवश्यक आहे. शरीरातील लठ्ठपणा, वजनवाढणे, चरबीत होणारी वाढ अन्य पोटाचे, स्नायूचे विकार अशा असंख्य तक्रारी वाढत आहेत.



मिशन फिट इंडिया अंतर्गत २० टक्के नियमित व्यायाम आणि ८० टक्के टाईमशीर आहार घेणे यामार्फत उत्तम आरोग्य रोहे येथे धावीर वेलनेस सेंटर मार्फत लोकांना सुविधा प्राप्त करून देण्यात येत आहेत. आपले शरीर निरोगी, सुदृढ राहिल्यास आपण कोणतेही कठीण काम करू शकता शरीरात ऊर्जा निर्माण होऊन उत्साह वाढत असतो. रोह्याचे पोलीस निरीक्षक मारुती पाटील हे कोल्हापूरचे व्यायामपट्टू आहेत. त्यांनी धावीर फिटनेस वेलनेस सेंटरला भेट दिली आणि या सेंटरच्या प्रमुख फिटनेस कोच सौ. ज्योती अविनाश पवार यांचे कौतुक केले. अनेक जणांचे वजन, लठ्ठपणा कमी झाल्याचे आणि उत्साह वाढल्याचे पाहिल्यावर आपल्या पोलीस स्टाफलादेखील रोहे येथे खासदार सुनिल तटकरे यांनी उभारलेल्या कुंडलिका नदी संवर्धनच्या प्रशस्त जागेत व्यायाम आणि योगा करण्याची संधी मिळाली.

खासदार तटकरे यांनी या स्तुत्य आणिआवश्यक उपक्रमाबद्दल ज्योती पवार फिटनेस कोच बद्दल गौरोवास्पद उदगार काढले व शुभेच्छा दिल्या. आज शरीर ही आपली स्वतःची संपत्ती आहे. ती उत्तम असेलतर सर्व कांही आहे, असे सांगितले.

### दिनदर्शिका प्रकाशन



**रोहा : स्नेह ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळाच्या सन २०२६ दिनदर्शिकेचे प्रकाशन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते कोलाड येथील सभागृहात करण्यात आले. या वेळी मंडळाचे अध्यक्ष दगडू बामुगडे यांनी खासदार तटकरे यांचे स्वागत व सन्मान केला.**

# माणगाव पंचायत समितीमध्ये समता सप्ताह साजरा

**माणगाव : बातमीदार**

माणगाव पंचायत समिती जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून समता सप्ताह/ समान संधी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माणगाव तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे पालक, पंचायत समिती विस्तार अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विशेष शिक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे व प्रास्ताविक डांगे यांनी केले.




तालुक्यातील १७ दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार प्राप्त झालेले साहित्य साधने व उपकरणे यांचे वाटप माणगाव पंचायत समिती येथील पंचायत समिती विस्तार अधिकारी चांदोरकर साहेब, आरोग्य विस्तार आंब्रे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी खामकर, शिक्षण विस्तार अधिकारी पालांडे व केंद्रप्रमुख निकम यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी पंचायत समितीमधील उपस्थित सर्व अधिकारी यांनी त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या योजनांची माहिती दिली. शासनाच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या योजनांबाबत माहिती स्नेहल पाटील व गायकवाड यांनी दिली.

# थंडीच्या गारव्यात ‘व्हेज पोपटी’ला पसंती

**धाटाव : प्रतिनिधी**

थंडीचा कडाक्याचा गारवा वाढत असताना रोहा परिसरात पारंपरिक पद्धतीने तयार होणाऱ्या पोपटीचा खास माहोल अनुभवायला मिळत आहे. डिसेंबर महिन्यात गावठी वालाच्या शेंगा उपलब्ध नसल्यामुळे या वेळी पावट्याच्या शेंग्यांचा वापर करून मटक्यात तयार होणारी व्हेज पोपटी खवय्यांची विशेष पसंती ठरत आहे. मार्गशीर्ष महिना असल्याने शाकाहारी पोपटीकडे नागरिकांचा ओढा अधिक वाढला आहे.



मटक्याच्या सभोवताली लाकडं लावून पेंड्याची उब दिली जाते. ही प्रक्रिया अगदी शेकोटी पेटवल्यासारखी असल्याने मटक्यातील भाज्या हळूहळू शिजत जातात आणि त्यांची नैसर्गिक चव अधिक खुलते. पोपटी शिजत असताना मटक्याभोवतीच लाकडांची शेकोटी पेटलेली असल्याने थंडीपासून बचाव होत असून, अनेकजण बाजूला उभे राहून शेकोटीची उब घेत गप्पांचा आणि वातावरणाचा आनंद घेताना दिसत आहेत.

या व्हेज पोपटीमध्ये पावट्याच्या शेंगा, मटार, रताळी, बटाटे, शेंगदाणे, मक्का, तुरीच्या शेंगा, हरभरा गठ्ठू , घेवड्याच्या शेंगा तसेच चवीनुसार पोपटी मसाला मीठ टाकला जातो असा भरगच्च शाकाहारी मेनू असतो. सर्व साहित्य मटक्यात घालून साधारण २० ते २५ मिनिटे मंद आचेवर शिजवले जाते. लाकडांच्या आचेवर शिजल्यामुळे पोपटीला एक वेगळीच चव आणि सुगंध लाभतो.

सायंकाळी आठ ते दहा वाजेदरम्यान ही पोपटी लावली जाते. थंडीचे वातावरण, शेकोटीची उब, मटक्यातील गरमागरम पोपटी आणि आजूबाजूला जमलेली माणसं–असा हा जिव्हाळ्याचा अनुभव सध्या रोहा शहरात पाहायला मिळत आहे. चव, परंपरा आणि गारव्यातील ऊब यांचा संगम असलेली ही पोपटी रोहेकरांसाठी थंडीतील एक खास आकर्षण ठरत आहे.

दरम्यान, थंडीचा महिना सुरू असल्याने अनेक जण रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणी रिसॉर्ट, फार्महाऊस बुकींग करून पोपटीचा आनंद घेत असतात.

# तिसऱ्या टी-२०मध्ये भारताचा विजय

## द. आफ्रिकेला हरवत २-१ अशी आघाडी

**धर्मशाला : वृत्तसंस्था**

हिमाचल प्रदेशातील धर्मशाला येथील मैदानात रंगलेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात भारतीय संघाने पाहुण्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाला २५ चेंडू आणि सात विकेट्सनी मात दिली. या विजयासह टीम इंडियाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

चंदीगड येथील मुल्लानपूरच्या मैदानात नाणेफेक गमावण्याचा सिलसिला खंडीत केल्यावर धर्मशालाच्या मैदानात सलग दुसऱ्या सामन्यात सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकली आणि पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मालिकेतील पहिल्या दोन सामन्यात टॉस जिंकणाऱ्या संघाच्या पदरी पराभव आला होता, पण तिसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून कर्णधाराने घेतलेला निर्णय गोलंदाजांनी सार्थ ठरवला अन् शेवटी



टीम इंडियाने सामनाही जिंकला.

अर्शदीप सिंग, हर्षित राणा यांनी गोलंदाजी वेळी दक्षिण आफ्रिकेच्या संघाला धक्क्यावर धक्के दिले. त्यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. वरुण चक्रवर्ती आणि कुलदीपनेही प्रत्येकी दोन गडी बाद करीत जलदगती गोलंदाजांच्या बरोबरीने कामगिरी करून दाखवली, तर हार्दिक पांड्या आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी एक विकेट्स घेत दक्षिण आफ्रिकेला फक्त ११७ धावांवर रोखले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना भारतीय संघाने १६व्या षटकात सात विकेट्स राखून विजय नोंदवला, पण माफक धावांचा पाठलाग करताना कोणताही दबाव नसताना कर्णधार सूर्यकुमार यादवसह शुबमन गिल पुन्हा अपयशी ठरले.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाने दिलेल्या माफक धावसंख्येचा पाठलाग करताना अभिषेक शर्माने टीम इंडियाला धमाकेदार अंदाजात सुरुवात करून दिली. डावातील पहिल्या चेंडूवर षटकारासह खाते उघडणाऱ्या अभिषेक शर्माने तीन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने १८ चेंडूत ३५ धावांची खेळी केली. शुबमन गिल २८ चेंडू खेळला, पण पुन्हा तो २८ धावांवर अडखळला. सूर्यकुमार यादवने दोन चौकार मारत माहोल निर्माण केला, पण मोठा फटका मारण्याच्या नादात तो एनिगडीच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. त्याने ११ चेंडूत १२ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर बढती मिळालेल्या तिलक वर्माने ३४ चेंडूत नाबाद २५ धावा केल्या. शिवम दुबेने षटकार आणि चौकार मारत १६व्या षटकात मॅच संपवली.

## टी-२०मध्ये अष्टपैलू पांड्याचा विश्वविक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तिसऱ्या टी-२० सामन्यात हार्दिक पांड्याने एक विकेट घेत विश्वविक्रमाला गवसणी घातली आहे. स्टब्सच्या रूपात तिसऱ्या सामन्यात विकेट नावे करताच पांड्याने आंतरराष्ट्रीय टी-२० कारकिर्दीत १०० विकेट्स पूर्ण केल्या. भारताकडून आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये १०० विकेट्स घेणारा तो तिसरा खेळाडू ठरला. याआधी अर्शदीप सिंग आणि जसप्रीत बुमराह यांनी ही कामगिरी केली होती, पण हार्दिक पांड्याच्या नावे खास विश्वविक्रमाची नोंद झाली आहे.



आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये १०० विकेट्स आणि १५०० धावा करणारा हार्दिक पांड्या हा पहिला जलदगती अष्टपैलू गोलंदाज ठरला आहे. याआधी कुणालाच अशी कामगिरी करता आलेली नाही.

आशिया कप स्पर्धेतील फायनल लढतीआधी दुखापतीमुळे संघाबाहेर असलेल्या पांड्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतून धमाकेदार कमबॅक केले आहे. पहिल्या सामन्यात अर्धशतकी खेळीसह त्याने गोलंदाजीत कमाल दाखवली होती. आता तिसऱ्या सामन्यात वर्ल्ड रेकॉर्ड रचत त्याने टी-२० वर्ल्डकपसाठी तयार असल्याचे दाखवून दिले आहे.

## जलद चार हजार धावा करण्यात तिलक वर्माने विराटला टाकले मागे!



**मुंबई : प्रतिनिधी**

तिसऱ्या टी-२० सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा सात विकेट्सने पराभव करत मालिकेत २-१ अशी महत्त्वाची आघाडी घेतली आहे. ११७ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने सोळाव्या षटकातच विजय मिळवला. या सामन्यात तिलक वर्माच्या नावावर नव्या विक्रमाची नोंद झाली.

या सामन्यातील नाबाद २५ धावांच्या खेळीद्वारे तिलक वर्माने टी-२० क्रिकेटमध्ये चार हजार धावा पूर्ण केल्या. या कामगिरीसह वर्माने विराट कोहली आणि शुबमन गिल यांना मागे टाकले आहे. केवळ १२५व्या डावात हा टप्पा गाठून टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद चार हजार धावा पूर्ण करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत वर्माने तिसरे स्थान पटकावले आहे.

तिलक वर्माने २०२३मध्ये आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून तो संघाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. त्याने आतापर्यंत ३९ टी-२० सामन्यांमध्ये एकूण १,११० धावा केल्या आहेत, ज्यात दोन शतके आणि पाच अर्धशतकांचा समावेश आहे. आयपीएलमध्ये तो मुंबई इंडियन्सकडून खेळतो, जिथे त्याच्या नावावर १४९९ धावा आहेत.

## कुस्ती स्पर्धेतून मातीशी नाळ जुळवून ठेवण्याचे काम -परेश ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुस्त्यांची संस्कृती राखून ठेवण्याचे आणि मराठी मातीशी नाळ जुळवून ठेवण्याचे काम जय बापदेव ग्रुप आणि ग्रामस्थ मंडळाच्या वतीने झाले आहे, असे गौरवोद्गार पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पाली खुर्द येथे कुस्त्यांच्या सामन्यांवेळी काढले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पाली खुर्द येथे आमदार चषक जिल्हास्तरीय कुस्त्यांच्या खुल्या दंगलींचे आयोजन रविवारी (दि. १४) करण्यात आले होते. कै. धाया दामा शेळके यांच्या स्मरणार्थ झालेल्या या स्पर्धेला माजी सभागृह नेते परेश ठाकूर



यांनी भेट देऊन उपस्थित खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

स्पर्धेस माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह राजेश भोईर, प्रवीण म्हात्रे, संतोष शेळके, चिंतामण शेळके, गुरुनाथ भोईर, महेंद्र भोईर, चेतन शेळके, हरीष शेळके, विनोद पाटे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी परेश ठाकूर यांनी कुस्तीसारख्या मर्दानी खेळाला आजही स्थानिक ग्रामस्थ आणि तरुण मंडळांकडून मिळत असलेल्या पाठिंब्याबद्दल आयोजकांचे विशेष अभिनंदन केले.

## मेस्सीला शाहांनी दिली खास बॅट

**नवी दिल्ली** : दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने गोट टूर ऑफ इंडिया अंतर्गत दिल्लीमध्ये चाहत्यांच्या भेटीला पोहचला होता. मेस्सी तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आला होता आणि याचा शेवटचा टप्पा सोमवारी (दि. १५) दिल्लीत पूर्ण झाला. येथे आयसीसीचे अध्यक्ष जय शाह मेस्सीच्या भेटीसाठी आले व त्यांनी खास भेट दिली.

मेस्सीबरोबर त्याचे दोन जिवलग मित्र आणि इंटर मियामी संघातील सहकारी लुईस सुआरेझ व रोद्रिगो दी पॉल होते. शाह यांनी मेस्सीला खास बॅट भेट दिली. या बॅटवर भारतीय संघाच्या दिग्गज खेळाडूंच्या स्वाक्षरी होत्या. यानंतर मेस्सीचे नाव व त्याचा जर्सी नंबर असलेली भारतीय संघाची टी-२० वर्ल्डकप जर्सी भेट दिली.





**पनवेल** : स्व. नानाशेठ घरत आणि स्व. सोनुबाई गोपीनाथ घरत यांच्या स्मरणार्थ पापडीचा पाडा येथे आयोजित स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी भेट दिली. या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, निर्दोष केणी, केशव घरत, शिवाजी घरत, विलास घरत, विनायक घरत, गणेश घरत, कैलास घरत, मंगेश घरत आदी उपस्थित होते.















**पनवेल : कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये सुमारे ३२५ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, आयुक्त मंगेश चितळे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारूशीला घरत, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, आरपीआयचे महापालिका जिल्हा क्षेत्राचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्यासह सर्व मंडळ अध्यक्ष, माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com